# यवतमाळ जिल्हा पोलीस राजपत्र

## अंक - १५

**दिनांक- १४/०४/२०२५ ते दिनांक- १९/०४/२०२५**

**राजपत्रातील ०६ भाग -**

| | |
|---|---|
| भाग - ०१ | बदली / नेमणुक / पदोन्नती |
| भाग - ०२ | रजा / बिनपगारी रजा |
| भाग - ०३ | वेतन / भत्ते / रोखिकरण |
| भाग - ०४ | बक्षिस / मानधन |
| भाग - ०५ | शिक्षा / निलंबन / सेवानिवृत्ती |
| भाग - ०६ | प्रशिक्षण व इतर |

**प्र. पोलीस उप अधिक्षक (मुख्या)**
**पोलीस अधिक्षक कार्यालय यवतमाळ**

**प्रति,**

**प्रभारी अधिकारी, सायबर सेल यवतमाळ -**

सदरचे गॅझेट हे जिल्हा पोलीस दल यवतमाळ चे **www.yavatmalpolice.gov.in** या अधिकृत संकेत स्थळावर **GAZETTE** या मथळ्याखाली प्रसिद्ध करावे. तसेच जिल्हयातील प्रत्येक शाखा / पो.स्टे./ उपविपोअ.यांचे **E- Mail** वरती पाठवावे.

प्रत,

नोंदणी लिपीक, आस्थापना शाखा, पो.अधि.कार्या. यवतमाळ.

# भाग - ०१

# बदली / नेमणुक / पदोन्नती

क्रमांक:पोअय/कक्ष-९(२पोशि ९३२ / 4275/२०२५
पोलीस अधिक्षक कार्यालय, यवतमाळ
एल. आय. सी. चौक, ता. व जि. यवतमाळ
पिन कोडः ४४५ ००१.
Email- sp.yavatmal@mahapolice.gov.in
दिनांक : 15 APR 2025

## कार्यालयीन आदेश

पोशि /९३२ आदित्य रमेश जाधव नेमणुक दिग्रस,हे दि.18/12/2024 ते दि. 15/04/2025 पावेतो एकुण 117 दिवस सिक पास वरून गैरहजर होते. दि.15/04/2025 रोजी कर्तव्यावर हजर होणे करिता आले असत मा.पोलीस अधिक्षक यांचे आज्ञांकित कक्षात कर्तव्यावर हजर करुन घेण्यात आले आहे..

(मा. पोलीस अधिक्षक, यवतमाळ यांचे आदेशाने)

(सुशिला पवार)
कार्यालय अधिक्षक
पोलीस अधिक्षक, यवतमाळ करिता.

पोशि /९३२ आदित्य रमेश जाधव नेमणुक दिग्रस,हे दि.18/12/2024 ते दि. 15/04/2025

प्रति,
वेतन लिपिक, कक्ष-18, यांना माहितीस.
प्रति, नेमणूक पो नि पो.स्टे दिग्रस
प्रत माहितीस व कार्यवाहीस,:- कक्ष-14( डि पी जी लिपीक)
पोशि /९३२ आदित्य रमेश जाधव नेमणुक दिग्रस यांना योग्य माहितीस

कार्यालय पोलीस अधीक्षक, यवतमाळ.
एल.आय.सी.चौक ता.व जि.यवतमाळ पिन कोड 445001
Email -sp.yavatmal@mahapolice.gov.in

क्र. पोअय/कक्ष-९ /आं.जिल्हा बदली-/हजर/नेमणूक/ ४२६० /२०२४ यवतमाळ, दिनांक :- 16 APR 2025

कार्यालयीन आदेश

**संदर्भ** :- १) या कार्यालयाचे पत्र क्र.पोअय/कक्ष९/आंजिब/स्विकृत्ती/२४२४,दिनांक २२/०२/२०२५
२)पोलीस अधिक्षक बिड यांचेकडील पत्र क्रं.आस्था- प्रलि/पो.कर्म/ /कार्यमुक्तआंजिब//८०८३/२०२५दिनांक१२.३.२०२५
३) पोलीस अधिक्षक गडचिरोली यांचे पत्र क्रं.पोअय/आस्था/सआली-१/आंजिब/कार्यमुक्त/पो.अ ८/२०२५ दिनांक ९.४.२०२५

**विषय** :- आंतर जिल्हा बदलीवर रुजू करुन घेणेबाबत...

******

या कार्यालयाचे संदर्भीय पत्राव्दारे, खालील नमूद पोलीस अंमलदार यांना त्यांचे नावासमोरील घटकातून यवतमाळ जिल पोलीस दलामध्ये पोलीस शिपाई या पदावर आंतर जिल्हा बदलीवर विनंतीवरुन घेण्यास स्विकृत्ती देण्यांत आलेली होत त्याअनुषंगाने संबधीत पोलीस अधिक्षक यांनी उपरोक्त संदर्भ क्र. २ व ३ अन्वये नमूद आदेशान्वये पोलीस शिपाई यांना आं जिल्हा बदलीवर हजर होणेकामी कार्यमुक्त केले आहे.

त्याअनुषंगाने यवतमाळ जिल्हा पोलीस दलामध्ये त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या दिनांकास बदलीवर हजर झाल्याने त्यां या घटकात हजर करुन घेवून त्यांना खालीलप्रमाणे नमूद रकाना क्र. ९ मध्ये असलेल्या ठिकाणी नेमणूक करण्यात येत आहे.

| अ.क्र. | पो.अंमलदाराचे नाव/पद व ब.क्र. | घटकाचे नाव | स्विकृत्तीचे पद | भरती प्रवर्ग | स्विकृत्ती प्रवर्ग | कार्यमुक्त दिनांक व या घटकात रुजू झाल्याचा दिनांक व वेळ | या आस्थापने वरील देण्यात आलेला ब.नंबर | यवतमाळ जिल्हयात नेमणूक ठिकाण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पोशि/८४५ नामदेव खोबाजी भिसे | पोलीस अधिक्षक बिड | पोलीस शिपाई | एस.टी. | एस.टी. | ७/४/२०२५ म.न ०९/४/२०२५ म.पू | **६८७** | **पोलीस मुख्यालय** |
| | पोशि/५१४८ शिवाजी गंगाधर शिंदे | पोलीस अधिक्षक गडचिरोली | पोलीस शिपाई | खुला | खुला | ९/४/२०२५ म.न ११/४/२०२५ म.पू | **७३१** | **पोलीस मुख्यालय** |

सदर पोलीस अंमलदार यांची सेवाजेष्ठता ही महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१७ ३८४३/प्र.क्र.४६९/पोल-५-ब, दिनांक २६/१०/२०१७ अन्वये, महाराष्ट्र राज्य पोलीस दलातील पोलीस शिपाई ते सहायक पोली उपनिरीक्षक दर्जापर्यतच्या पोलीस अंमलदाराच्या घटक आस्थापना बदली नियमावली मधील नियम क्र.५ नुसार निश्चित करण्यां येईल. तसेच उपरोक्त दोन्ही पोलीस अंमलदार यांची आंतर जिल्हा बदली ही विनंती वरुन असल्याने त्यांना प्रवास भत्ता दे राहणार नाही.

**(मा.पो.अ.यांचे मान्यतेने )**

( सुनिल हूड)
प्र.पोलीस उपअधिक्षक मुख्यालय
पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांचेकरीता.

**प्रति,**

वर नमूद पोलीस अंमलदार

**मार्फत** :- पोलीस निरीक्षक, पोलीस नियंत्रण कक्ष, यवतमाळ.

१२ यांनी उपरोक्त पोलीस अंमलदार यांना आदेशाची प्रत अदा करुन त्यांना त्यांचे नेमणूकीचे ठिकाणी रवाना करावे व तसा अनुपालन अहवाल सादर करावा

**प्रत माहितीस** :- राखीव पोलीस निरीक्षक पो.म

PYAT-11022(15)/26/2025-CB-YTL-SP 1/35814/202

क्रमांक:पोअय/कक्ष-११/ कार्यासन आदेश/4377 /२०२५
पोलीस अधिक्षक कार्यालय यवतमाळ
एल.आय.सी.चौक, ता.व जि.यवतमाळ, पिन कोड : ४४५००१
Email- sp.yavatmal@mahapolice.gov.in
दिनांक :- 17 APR 2025

## -: आदेश :-

**संदर्भ :-** १) या कार्यालयाचे आदेश क्र. पोअय/कक्ष-११/मंत्रालयीन कर्मचारी-बदली/२०२३/६२२३ दि.२१/६/२०२३
२) या कार्यालयाचे आदेश क्र. पोअय/कक्ष-११/ कार्यासन आदेश/२२५६१/२०२४ दि.२९/११/२०२४

**विषय :-** वरिष्ठ श्रेणी लिपीक यांचे कार्यासन नेमणुकीबाबत

---ooo---

पोलीस अधीक्षक कार्यालय यवतमाळ या आस्थापनेवरील **वरिष्ठ श्रेणी लिपीक आयशा रब** यांची जावक (कक्ष ८-१) प्रबंधक शाखा या कार्यासनावर नेमणुक करण्यात येत असुन खालीलप्रमाणे जावक (कक्ष -८) या कार्यासनाच्या कामकाजाचे विभाजन करण्यात येत आहे.

| अ.क्र. | लिपीक कर्मचारी नाव व पदनाम | यापुर्वीचे कार्यासन ठिकाण | नविन नेमणुकीचे ठिकाण | कामकाज |
|---|---|---|---|---|
| १ | श्रीमती आयशा रब, वरिष्ठ श्रेणी लिपीक | नोंदणी लिपीक, आस्थापना शाखा. | जावक (कक्ष ८-१) प्रबंधक शाखा | पोलीस अधीक्षक कार्यालयातील शाखेकडुन प्राप्त टपाल ई-ऑफीस कार्य प्रणालीवर पोलीस स्टेशनला पाठविणे व टपाल संबंधाने इतर कामे. |
| २ | श्रीमती रंजिता चव्हाण, कनिष्ठ श्रेणी लिपीक | -- | जावक (कक्ष ८-२) प्रबंधक शाखा | पोलीस अधीक्षक कार्यालयातील शाखेकडुन प्राप्त टपाल ई-ऑफीस कार्य प्रणालीवर वरिष्ट कार्यालयास (पो. महासंचालक कार्यालय महाराष्ट्र राज्य मुंबई, वि.पो.म.नि.कार्यालय अमरावती) पाठविणे व टपाल संबंधाने इतर कामे. |

तसेच श्रीमती आयशा रब, वरिष्ट श्रेणी लिपीक यांचेकडील नोंदणी लिपीक कार्यासन रद्द करण्यात येत असल्याने सदर नोंदणीबाबतचा विषय संबंधित सहाय्यक आस्थापना लिपीक १ ते ५ यांचेकडे हस्तांतरीत करण्यात येत आहे.

Signed by
Kumar Chintha
Date: 16-04-2025 19:25:27

**पोलीस अधीक्षक यवतमाळ.**

**प्रति,**

१) श्रीमती आयशा रब, वरिष्ट श्रेणी लिपीक, पो.अ.कार्यालय यवतमाळ
२) श्रीमती रंजिता चव्हाण, कनिष्ट श्रेणी लिपीक पो.अ.कार्यालय यवतमाळ

**प्रत** :- कार्यालय अधिक्षक/पो.उप.अधि.(मुख्या.) यवतमाळ/राजपत्र लिपीक (कक्ष-१४)/प्रमुख लिपीक आस्थापना शाखा, पत्रव्यवहार शाखा, लेखा शाखा, प्रबंधक शाखा.

क्र. पोअय/कक्ष-९/पदोन्नती/पोहवा-सपोउपनि /4404/ २०२५
पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांचे कार्यालय, एल.आय.सी.चौक,
ता. व जि. यवतमाळ, पिन कोडः ४४५००१.
ई मेल : sp.yavatmal@mahapolice.gov.in
दिनांक : 18 APR 2025

## कार्यालयीन आदेश

मा. सर्वोच्च न्यायालय येथे दाखल विशेष अनुमती याचिका क्र. २८३०६/२०१७ मध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयास अधिन राहून महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.बीसीसी २०१८/प्र.क्र.३६६/१६-ब, दि.०७ मे २०२१ अन्वये सेवाप्रवेशाच्या मूळ सेवाजेष्ठतेनुसार पदोन्नती देण्याबाबत निर्देश देण्यात आले आहेत.

यवतमाळ जिल्हा पोलीस घटकाच्या आस्थापनेवरील खालील नमूद **पोलीस हवालदार यांना सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक** या पदावर वेतन संरचना २९२०० - ९२३०० मध्ये सेवाप्रवेशाचे मुळ सेवाजेष्ठतेने खालील नमूद अटींचे अधिन राहून तात्पुरत्या स्वरुपात दिनांक **१८.०४.२०२५** पासुन पदोन्नती देण्यात येत आहे. पदोन्नती नंतर ते सध्या ज्या ठिकाणी कार्यरत आहेत त्याच ठिकाणी कार्यरत राहतील.

| अ.क्र | ब.नं. | पदनाम | पोलीस अंमलदार यांचे नाव | पदोन्नतीचा प्रवर्ग | नेमणूक ठिकाण |
|---|---|---|---|---|---|
| १ | १५२६ | पो.हवा | हरिदास दुर्योधनजी मेश्राम | सेवाजेष्ठतेनुसार | पोलीस मुख्यालय |
| २ | २०१४ | पो.हवा | सुभाष बन्सी धुळे | सेवाजेष्ठतेनुसार | पो.स्टे. दराटी |
| ३ | ३८७ | पो.हवा | गणेश उत्तमराव राठोड | सेवाजेष्ठतेनुसार | पो.स्टे उमरखेड |
| ४ | २२१० | पो.हवा | संजय मारोती शिंगारे | सेवाजेष्ठतेनुसार | पोलीस मुख्यालय |
| ५ | १४ | पो.हवा | आनंदराव तुकाराम चंदेवाड | सेवाजेष्ठतेनुसार | पो.स्टे. वसंतनगर |
| ६ | ४१६ | पोहवा | अर्जून केशवराव कुमरे | सेवाजेष्ठतेनुसार | पोलीस मुख्यालय |
| ७ | १३१३ | पो.हवा | शंकर सुंदरसिंग राठोड | सेवाजेष्ठतेनुसार | पो.स्टे खंडाळा |
| ८ | ८९ | पो.हवा | रविदास सिताराम चव्हाण | सेवाजेष्ठतेनुसार | पो.स्टे पुसद शहर |
| ९ | ३२३ | पो.हवा | प्रमिला डेरे | सेवाजेष्ठतेनुसार | महिला कक्ष |
| १० | ६६ | पो.हवा | श्रीकांत शालीग्राम इंगळे | सेवाजेष्ठतेनुसार | मो.प.विभाग |
| ११ | ७१५ | पो.हवा | राजु अरुण वरठी | सेवाजेष्ठतेनुसार | पो.स्टे नेर |
| १२ | ९५९ | पो.हवा | अशोक शिवराम पत्रे | सेवाजेष्ठतेनुसार | उप वाहतूक शाखा पांढरकवडा |
| १३ | २६५ | पो.हवा | संजय राजाराम जाधव | सेवाजेष्ठतेनुसार | पो.स्टे अवधूतवाडी |
| १४ | ५९६ | पोहवा | देविदास कचरु आठवले | सेवाजेष्ठतेनुसार | पो.स्टे. पोफाळी |
| १५ | २५ | पो.हवा | प्रफुल घनश्याम पावसेकर | सेवाजेष्ठतेनुसार | मो.प.वि |
| [illegible] | [illegible] | [illegible] | [illegible] | सेवाजेष्ठतेनुसार | पो.स्टे पुसद ग्रामीण |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १७ | ६५१ | पो.हवा | रत्नाकर मारोतराव सलामे | सेवाजेष्ठतेनुसार | पो.स्टे घाटजी |
| १८ | १७९ | पो.हवा | नंदकिशोर रामजी जाधव | सेवाजेष्ठतेनुसार | महामार्ग करंजी |
| १९ | ८१ | पो.हवा | प्रमोद विरुपक्ष निर्मलकर | सेवाजेष्ठतेनुसार | पो.स्टे पाटण |
| २० | ३९७ | पो.हवा | गोपाल विश्वनाथ वास्टर | सेवाजेष्ठतेनुसार | पो.स्टे राळेगाव |
| २१ | ७२३ | पो.हवा | विशाल गजाननराव धलवार | सेवाजेष्ठतेनुसार | उपविपोअ कार्या. यवतमाळ |
| २२ | ९६५ | पो.हवा | वासुदेव पांडूरंग साटोणे | सेवाजेष्ठतेनुसार | बीडीडीएस |
| २३ | ६१८ | पो.हवा | योगेश विलासराव बेंद्रे | सेवाजेष्ठतेनुसार | जि.वि.शा |
| २४ | २४५ | पो.हवा | निवृत्ती तुळशिराम कुळसंगे | सेवाजेष्ठतेनुसार | वाहतूक शाखा पांढरकवडा |
| २५ | ५२५ | पो.हवा | किसन वसराम जाधव | सेवाजेष्ठतेनुसार | पो.स्टे पुसद ग्रामीण |
| २६ | ८८३ | पो.हवा | अरुण सिताराम पवार | सेवाजेष्ठतेनुसार | पो.स्टे आर्णी |
| २७ | २२५ | पो.हवा | अमिन निजाम चव्हाण | सेवाजेष्ठतेनुसार | महामार्ग उमरखेड |
| २८ | २१३ | पो.हवा | बंडू बारकाजी राठोड | सेवाजेष्ठतेनुसार | पो.स्टे दिग्रस |
| २९ | ७०६ | पो.हवा | अर्जुन रंगराव राठोड | सेवाजेष्ठतेनुसार | पो.स्टे लोहारा |
| ३० | ९०१ | पो.हवा | दिलीन रामदास पवार | सेवाजेष्ठतेनुसार | पो.स्टे आर्णी |
| ३१ | २६७ | पो.हवा | केशव लच्छमन्ना आदेवार | सेवाजेष्ठतेनुसार | पो.स्टे अवधूतवाडी |
| ३२ | ९४२ | पो.हवा | प्रल्हाद रामधन राठोड | सेवाजेष्ठतेनुसार | पो.स्टे पोफाळी |
| ३३ | ८२० | पो.हवा | रमेश किसन राठोड | सेवाजेष्ठतेनुसार | पो.स्टे पुसद शहर |
| ३४ | २०४ | पो.हवा | सुरेश दयाराम पवार | सेवाजेष्ठतेनुसार | वाहतूक शाखा उमरखेड |
| ३५ | १३५६ | पो.हवा | अब्दुल नईम शेख मक्सुद | सेवाजेष्ठतेनुसार | पो.स्टे मुकूटबन |
| ३६ | १५९ | पो.हवा | पंडीत जेसा राठोड | सेवाजेष्ठतेनुसार | पो.स्टे पुसद ग्रामीण |
| ३७ | १४०४ | पो.हवा | मनोज विष्णू भैरव | सेवाजेष्ठतेनुसार | पो.स्टे यवतमाळ शहर |
| ३८ | ८५३ | पो.हवा | संजय रायभान लांजेवार | सेवाजेष्ठतेनुसार | पो.स्टे बाभुळगाव |
| ३९ | ५९० | पो.हवा | पुंडलीक दत्ता धुर्वे | सेवाजेष्ठतेनुसार | पो.स्टे दराटी |
| ४० | ८९३ | पो.हवा | पंडीत माणिकराव पुंडे | सेवाजेष्ठतेनुसार | पो.स्टे पोफाळी |
| ४१ | १६१ | पो.हवा | प्रकाश बाबाराव कदम | सेवाजेष्ठतेनुसार | पोलीस मुख्यालय |
| ४२ | १०९२ | पो.हवा | संजय किसन राठोड | सेवाजेष्ठतेनुसार | पो.स्टे बाभुळगाव |
| ४३ | ४५६ | पो.हवा | दयानंद नारायण जांभळे | सेवाजेष्ठतेनुसार | पो.स्टे उमरखेड |
| ४४ | ३२१ | पो.हवा | किशोर नारायण येडमे | सेवाजेष्ठतेनुसार | श्वान पथक |

**अटी व शर्ती :**

१.उपरोक्त नमुद पोलीस अंमलदार यांचेविरुध्द काही न्यायिक अथवा विभागीय कार्यवाही प्रलंबित अगर प्रस्तावित नसलेबाबत लेखी बंधपत्र घेऊन या कार्यालयास सादर करावे.
२.उपरोक्त नमुद पोलीस अंमलदार यांचेविरुध्द काही विचौ/प्राचौ/शिक्षा/न्यायीक प्रकरण निलंबित अगर प्रस्तावित असल्यास त्यांना सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक पदोन्नती लागु करण्यात येऊ नये व याबाबत या कार्यालयास लेखी अवगत करावे.

३.उपरोक्त पदोन्नती हया जात वैधता प्रमाणपत्राबाबत शासनाच्या प्रचलित नियमांचे व न्यायिक प्रकरणांचे अधीन तात्पुरत्या स्वरुतात देण्यात येत आहे.

४.पदोन्नत पोलीस अंमलदारांना पदोन्नती नाकारल्यामुळे उध्दभवणारे परिणाम व त्याबाबतची अवलंबण्याची कार्यवाही याबाबतचे शासन निर्णय समान्य प्रशासन विभाग क्र.एसआरव्ही २०१५/प्र.क्र.३०३/का.१२ दिनांक १२.०९.२०१६ मधील तरतुदी निदर्शनास आणुण दयाव्यात.

वर नमूद पोलीस अंमलदार यांना आता निलंबित केले असेल किंवा त्यांच्या विरुध्द नव्याने गंभीर कसुरी बाबत विभागीय चौकशी प्रलंबित असेल किंवा न्यायालयात खटला चालु असेल किंवा न्यायालयाने दिलेल्या इतर निर्णयाविरुध्द वरिष्ठ न्यायालयात अपील प्रलंबित असेल किंवा जर ते एखादी शिक्षा भोगत असतील तर असे निदर्शनास आल्यास त्यांना पदोन्नती न देता तात्काळ या कार्यालस कळविण्यात यावे.

शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक पीअेचवाय/१०८२/सीआर/११००(२)/एसईआर-३ दिनांक ०६.११.१९८४ अन्वये पदोन्नतीनंतरच्या पदावर वेतन निश्चिती करण्याबाबत विकल्प दयावयाचा असेल तो पदोन्नती दिल्याचे दिनांकापासुन ०१ महिन्याच्या आत या कार्यालयास सादर करावा. वेतन निश्चिती करीता दयावयाचा विकल्प ०१ महिनेचे आत या कार्यालयास प्राप्त न झाल्यास पदोन्नती पदावरील वेतन निश्चिती म.ना.सेवा (वेतन) नियम १९८१ मधील नियम ११(१) (ए) आणि शासन अधिसूचना, वित्त विभाग क्रमांक वेपुर १२०९/प्र.क्र.२७/सेवा-९ दिनांक २२.०४.२००९ मधील नियम १३ (ब) (२) अन्वये पदोन्नतीचा दिनांक विचारात घेवून करण्यात येईल.

वर नमूद पोलीस अंमलदार यांना कळविण्यात येत की महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. एसआरव्ही/२०१५/प्र.क्र.३०३/का.१२ दिनांक १२.०९.२०१६ अन्वये जे अंमलदार सदरची पदोन्नती नाकारणार आहेत अशा अंमलदारांना दोन वर्षा पर्यंत त्यांना त्यांचे पदोन्नती करीता विचार करण्यात येणार नाही.

ज्या पोलीस अंमलदार यांना पदोन्नती नाकारावयाची असेल त्यांनी ७ दिवसाचे आत प्रभारी अधिकारी यांचे मार्फतीने अर्ज या कार्यालयास सादर करावा.

वरील नमूद सहाय्यक पोलीसउपनिरीक्षक यांनी उपरोक्त अटींची पुर्तता केलेली असल्यास पदोन्नती स्विकारल्याचा दिनांक व वेळ या कार्यालयास तात्काळ अवगत करावा.

**" पदोन्नती झालेल्या सर्व पोलीस अंमलदारांना पदोन्नती बद्यल हार्दिक शुभेच्छा "**

Kumar

**( कुमार चिंता )**
पोलीस अधीक्षक, यवतमाळ.

**प्रति,**

**संबधीत अंमलदार**

**मार्फत** - संबधित ठाणेदार /शाखा प्रमुख.

ठाणेदार/शाखा प्रमुख यांनी सदर पदोन्नतीचे आदेश पोलीस अंमलदार यांचे समोर गणेनवर वाचून दाखवावे तसेच ज्या पोलीस अंमलदारांनी पदोन्नती स्विकारलेली आहे त्या बाबतची नोंद हृद्यावर नोंदवही मध्ये नोंद घेवून त्या बाबतचा सविस्तर अहवाल या कार्यालयास सादर करावा.

**प्रत-** अपर पोलीस अधिक्षक, यवतमाळ/पोलीस उपअधिक्षक (मुख्या)/कार्यालय अधिक्षक//राखीव पोलीसनिरीक्षक पो.मु/प्रमुख लिपी लेखा शाखा/पत्रव्यवहारा शाखा, वि.चौ शाखा, प्रबंधक शाखा/सहा.आस्थापना (कक्ष - ९) १ ते ५/ कक्ष-१७- वेतन लिपिक-२.वेतन लिपीक-१/लघूलेखक/पोलीस कल्याण /कक्ष-१४/ कक्ष-१२-विभागीय चौकशी याना आवश्यक कार्यवाहीस शाखा/राजपत्र लिपीक/कक्ष-१२-विभागीय चौकशी यांना माहिती व योग्य त्या कार्यवाही करीता

# भाग - ०२

# रजा / बिनपगारी रजा

क्रमांक:पोअय/कक्ष ९-(१) /गैरहजर रुजु/ 4357 /२०२५
कार्यालय पोलीस अधिक्षक, यवतमाळ
एल.आ.सी.चौक ता. व जि.यवतमाळ.
पिन कोड : ४४५००१
Email- sp.yavatmal@mahapolice.gov.in
दिनांक : 16 APR 2025

महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

## कार्यालयीन आदेश

---०००---

**पोहवा/३०६ गजानन राठोड नेमणुक पो.स्टे.पुसद ग्रामीण (सलग्न) पो.मु.यवतमाळ** येथे नेमणुकीस असुन हे दिनांक २७.०३.२०२५ चे ८.०० वा. पासुन ते दिनांक १६.०४.२०२५ पर्यत २१ दिवस गैरहजर होते. ते दिनांक १६.०४.२०२५ रोजी कर्तव्यावर हजर होण्याकरिता आले असता त्यांना मा.पोलीस अधिक्षक यांचे **आज्ञांकित कक्षामध्ये हजर करुन घेण्यात आले आहे.** तसेच त्यांचा दिनांक २७.०३.२०२४ चे ८.०० वा. पासुन ते दिनांक १६.०४.२०२५ पर्यत २१ दिवस गैरहजर दिवस रजा कालावधी हा महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ मधिल ६१ चे तरतुदीनुसार परावर्तीत रजा खालील प्रमाणे मंजुर करण्यात आला आहे.

| अ. क्र | पोलीस अंमलदार नाव पदनाम व बन | नेमणुक | वैद्यकीय कालावधी | दिवस | मंजुर करण्यात आलेली रजा |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | पोहवा/३०६ गजानन राठोड | पो.मु.यवतमाळ | दि. २७.०३.२०२५ चे ८.०० वा ते दि. १६.०४.२०२५ पर्यत | एकुण २१ दिवस | परावर्तीत रजा |

(मा.पो.अ.यांचे आदेशान्वये)

(सुनिल हुड)
प्र.पोलीस उपअधिक्षक,(मुख्या)
पोलीस अधिक्षक ,यवतमाळ करिता

**प्रति,** पोहवा/३०६ गजानन राठोड नेमणुक (सलग्न) पो.मु.यवतमाळ
**मार्फत -** रा.पो.नि.पो.मु.यवतमाळ
**प्रत :** वेतन लिपीक कक्ष -१८/ डिपीजी लिपीक कक्ष १४ योग्य कार्यावाहीस्तव सादर.

Ravi/Sick-aadesh/E-5

PYAT-11022(15)/12/2025-CB-YTL-SP 1/35811/202

क्रमांक: पोअय/कक्ष-११/का.शिपाई -सुरपाम/विनावेतन/4378 /२०२५
कार्यालय पोलीस अधीक्षक, यवतमाळ.
एल. आय. सी. चौक, ता. व जि. यवतमाळ
पिन कोड :- ४४५ ००१.
Email- sp.yavatmal@mahapolice.gov.in
दिनांक :- 17 APR 2025

**कार्यालयीन आदेश -**

**संदर्भ :-** कार्यालयीन शिपाई मंदा सुरपाम यांचा विनंती अर्ज दि.२४/०३/२०२५

**विषय :-** कार्यालयीन शिपाई मंदा सुरपाम पो.अ.कार्यालय यवतमाळ यांचे रजेबाबत.

---ooo---

कार्यालयीन शिपाई मंदा सुरपाम पोलीस अधिक्षक कार्यालय यवतमाळ या दि.०३/०३/२०२५ ते दि. १०/०३/२०२५ एकुण ०८ दिवस पर्यंत वैद्यकीय कारणास्तव रजेवर होत्या. परंतु त्यांनी रजा कालावधीमधील वैद्यकीय उपचाराचे कागदपत्र परिपुर्ण कार्यालयास सादर न केल्याने त्यांचा कर्तव्यातील एकुण ०८ दिवस रुग्णनिवेदन कालावधी महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ मधील नियम ६३ अन्वये **असाधारण रजा** करण्यात येत आहे.

Signed by
Kumar Chintha
Date: 16-04-2025 19:21:32

**पोलीस अधीक्षक, यवतमाळ.**

**प्रति,**

कार्यालयीन शिपाई मंदा सुरपाम पोलीस
नेमणुक लेखा शाखा, पो.अ.कार्यालय यवतमाळ

**प्रत :-** पो.उप.अधि.मुख्या.यवतमाळ /कार्यालय अधिक्षक/ कक्ष-१७/कक्ष-१४ यांना माहिती व योग्य कार्यवाहीस

# भाग - ०३

# वेतन / भत्ते / रोखिकरण

# भाग - ०४

# बक्षिस / मानधन

निरंक

# भाग - ०५

# शिक्षा / निलंबन / सेवानिवृत्ती

क्रमांक: पोअय/कक्ष-१२/वि.चौ/अं.आ/पोशि-१२४४ उईके/ /२०२५
कार्यालय पोलीस अधीक्षक, यवतमाळ.
एल. आय. सी. चौक, ता. व जि. यवतमाळ
पिन कोड :- ४४५ ००१.
Email- sp.yavatmal@mahapolice.gov.in
दिनांक :- 15 APR 2025

## अंतिम आदेश

**संदर्भ** :- पोअय/कक्ष-१२/वि.चौ/कादानो/पोशि-१२४४ अक्षय उईके/२२७५/२०२५, दिनांक १८/०२/२०२५.

**कसुरदाराचे नाव** :- पोशि/१२४४ अक्षय रामदास उईके, तत्का. पो.मुख्या. यवतमाळ सध्या पो.स्टे. वणी.

**थोडक्यात कसुरी** :- दिनांक ११/०८/२०२१ ते अदयाप पावेतो दिर्घ कालावधी पासुन अनधिकृतपणे गैरहजर राहुन कर्तव्यात कसुरी केल्याबाबत.

---ooo---

१) कसुरदार पोशि/१२४४ अक्षय रामदास उईके, तुम्ही पोलीस मुख्यालय यवतमाळ येथे नेमणुकीस असतांना शरिरातील रक्ताचे प्रमाण कमी झाल्याचे कारण नोंद करुन दिनांक ११/०८/२०२१ चे १९.४५ वा. पासुन सिक रजेवर रवाना झाले असुन ते अदयाप पर्यत ते कर्तव्यावर हजर झाले नाही. तसेच तुम्ही वैदयकीय उपचाराबाबतचे कोणतेही कागदपत्र पोलीस मुख्यालय यवतमाळ येथे सादर केले नाही.

२) कसुरदार पोशि/१२४४ अक्षय रामदास उईके, तत्का. नेमणुक पोलीस मुख्यालय यवतमाळ तुमची यां कार्यालयाचे आदेश क्र. पोअय/प्रली/कक्ष-९/पो.अंमलदार/बदल्या-२०२२/१३९६४/२०२२, दिनांक २३/१२/२०२२ अन्वये पोलीस मुख्यालय यवतमाळ येथुन पो.स्टे. वणी येथे बदली झाल्याने तुम्हाला दिनांक २६/०४/२०२३ रोजी पोलीस मुख्यालय यवतमाळ येथुन स्थीत कार्यमुक्त करण्यात आले. व सदर बदली पासची मुळ प्रत दिनांक २६/०४/२०२३ चे १२.०० वा. तुमचे शासकीय निवासस्थान पळसवाडी पोलीस लाईन यवतमाळ येथे पोना/१२३ प्रकाश चव्हाण यांनी तुम्हाला दिली त्याबाबत स्टेडा साना क्र. १८/२०२३ दिनांक २६/०४/२०२३ चे १२.३० वा. नोंद घेण्यात आली. परंतु तुम्ही आजपावेतो पो.स्टे. वणी येथे कर्तव्यावर हजर झालेले नाही.

३) कसुरदार पोशि/१२४४ अक्षय रामदास उईके, तत्का. नेमणुक पो.मुख्या. यवतमाळ यांना कर्तव्यावर हजर होणेबाबत पोलीस मुख्यालय यवतमाळ येथुन दिनांक ०७/१०/२०२१, २७/११/२०२१, १०/०२/२०२२, १५/०३/२०२२, ११/०७/२०२२, ०२/०९/२०२२, ०५/१२/२०२२, २०/०१/२०२३, ११/०४/२०२३ अन्वये आगामी काळामध्ये अतिमहत्वाचे बंदोबस्त असल्याने कर्तव्यावर हजर होणेबाबत एकुण ०९ नोटीस देण्यात आल्या असुन सदर नोटीस तुम्ही वेळोवेळी तामील करुन सुध्दा तुम्ही कर्तव्यावर हजर झालेले नाही तसेच वैदयकीय कागदपत्र सुध्दा सादर केलेली नाही. यावरुन तुम्ही वरिष्ठांनी दिलेल्या आदेशाला जुमानत नसुन त्यांनी दिलेल्या आदेशाची अवहेलना करीत असल्याचे निदर्शनास येत आहे.

४) कसुरदार पोशि/१२४४ अक्षय रामदास उईके, तुमचे सेवाअभिलेखाची पडताळणी केली असता, तुम्ही यवतमाळ जिल्हा पोलीस आस्थापनेवर दिनांक १०/०७/२०१५ रोजी अनुकंपा तत्वानुसार भरती झाली असुन तुमचे अल्प सेवाकालाधीमध्ये यापुर्वी सुध्दा तुम्ही दिनांक २६/१०/२०१९ ते २४/०८/२०२० पावेतो एकुण ३०४ दिवस कर्तव्यावर अनधिकृतपणे गैरहजर असल्याप्रकरणी या कार्यालयाचे आदेश क्र डीपी/३१-बी-

हा बिनपगारी रजा म्हणुन मंजुर करण्यात आला आहे. तसेच तुम्ही पुन्हा दिनांक ११/०८/२०२१ पासुन कर्तव्यावर गैरहजर आहात. यावरुन तुम्ही स्वमर्जीने कोणतेही ठोस वैदयकीय कारण नसतांना दिर्घकालावधी पासुन कर्तव्यावर गैरहजर राहण्याचे सवईचे असल्याचे निदर्शनास येत आहे.

५) कसुरदार पोशि/१२४४ अक्षय रामदास उईके, तुम्ही प्राथमिक चौकशी दरम्यान डॉ. शहा, यवतमाळ व डॉ. कोडगीरवार यवतमाळ यांचे वैदयकीय कागदपत्रे सादर केली असुन तुमचे उपचार संबधाने डॉ. शहा, यवतमाळ यांचे दिनांक ३१/०१/२०२५ चे पत्रान्वये व डॉ. कोडगीरवार यवतमाळ यांचे दिनांक ३१/०१/२०२५ चे पत्रानुसार तुमचे उपचारास जास्तीत जास्त ६० दिवसांचा कालावधी लागु शकते असे कळविले आहे. यावरुन तुम्ही वैदयकीय कारण समोर करुन दिर्घकालावधी पासुन कर्तव्यावर गैरहजर असल्याचे स्पष्ट होत आहे.

६) कसुरदार पोशि/१२४४ अक्षय रामदास उईके, तत्का. नेमणुक पो.मुख्या. यवतमाळ तुम्ही दिनांक ११/०८/२०२१ पासुन ते अदयाप पर्यत कर्तव्यावर गैरहजर असुन दरम्यान होणा-या सार्वत्रिक लोकसभा निवडणुक -२०२४ व विधानसभा निवडणुक -२०२४ या अतिमहत्वाचे बंदोबस्त मध्ये गैरहजर असल्याने तुमच्या डयुटीचा अतिरीक्त भार इतर पोलीस अंमलदार यांना सहन करावा लागला आहे. अशाप्रकारे तुम्ही महाराष्ट्र पोलीस नियमावली १९९९ भाग ०३ मधील नियम क्र. ५५ अन्वये सार्वत्रिक निवडणुकीच्या वेळी कायदा व सुव्यवस्था राखणे या दिलेल्या कर्तव्यामध्ये कसुरी केल्याचे निष्पन्न होत आहे. यावरुन तुम्हाला पोलीस विभागामध्ये नौकरी करण्याचे स्वारस्य दिसुन येत नाही. तसेच तुम्ही कोणतीही कारण नसतांना सतत कर्तव्यावर गैरहजर राहत असुन तुमचे हे वर्तन बेशिस्त, बेजबाबदार, आणि अक्षम्य गभीर स्वरुपाचे दिसुन येत आहे. अशाप्रकारे तुम्ही लोकसेवक या पदाला न शोभणारे बेशिस्त, बेजबाबदार, व पोलीस अंमलदार या पदास अशोभनीय गैरवर्तन केले आहे.

उपरोक्त प्रकरणी या कार्यालयाचे आदेश क्र. पोअय/कक्ष-१२/प्रा.चौ/पोशि-१२४४ उईके/८०१७/२०२४, दिनांक ०७/०७/२०२४ अन्वये प्रभारी अधिकारी पो.स्टे. अवधुतवाडी यांना प्राथमिक चौकशी करणेबाबत आदेशीत करण्यात आले. सदर प्राथमिक चौकशीमध्ये तुमचेवर ठेवण्यात आलेले दोषारोप निष्पन्न होत असल्यामुळे या कार्यालयाचे आदेश क्र. पोअय/कक्ष-१२/वि.चौ/पोशि-१२४४ अक्षय उईके/२२५६६/२०२४, दिनांक ३०/१२/२०२४ अन्वये विभागीय चौकशी आदेशीत करण्यात आली असुन उपविभागीय पोलीस अधिकारी, पुसद यांना प्राधिकृत करण्यात आले आहे. सदर विभागीय चौकशीमध्ये तुम्हास संपुर्ण संधी उपलब्ध करुन देण्यात येवुन उपविभागीय पोलीस अधिकारी, पुसद यांनी दिनांक ०५/०२/२०२५ रोजी विभागीय चौकशी पुर्ण करुन समारोप अहवाल सादर केला. सदर अहवालामध्ये तुम्ही केलेले कृत्य हे पोलीस खात्यास अशोभनिय, बेशिस्त व बेजबाबदारपणाचे तसेच तुम्ही कर्तव्यात अत्यंत गंभिर स्वरुपाचे गैरवर्तन केल्याचे निदर्शनास येत असल्यामुळे तुम्हाला या कार्यालयाचे कारणे दाखवा नोटीस क्र. पोअय/कक्ष-१२/वि.चौ/कादानो/पोशि-१२४४ अक्षय उईके/२२७५/२०२५, दिनांक १८/०२/२०२५ नुसार तुम्हास नमुद कसुरीबाबत मुंबई पोलीस (शिक्षा आणि अपिले) नियम १९५६ मधील नियम ३ (१) (तिन) व महाराष्ट्र पोलीस नियमावली १९९९ भाग-१ मधील नियम क्र. ४३६ (II) (क) मधील तरतुदीनुसार "सेवेतुन बडतर्फ" (Dismiss From service) ही शिक्षा का देण्यात येवु नये? म्हणुन कारणे दाखवा नोटीस देण्यात आली होती. तुम्हाला दिनांक २१/०२/२०२५ रोजी कारणे दाखवा नोटीस प्राप्त झाली व तुम्ही दिनांक २७/०२/२०२५ ला स्पष्टीकरण या कार्यालयास सादर केले. तसेच सदर कारणे दाखवा नोटीसचे अनुषंगाने प्रस्तावित करण्यात आलेल्या शिक्षेसंबधाने निर्णय घेणेकरीता तुम्हाला दिनांक ११/०४/२०२४ ला आज्ञाकीत कक्षामध्ये बोलविण्यात आले असता तुम्ही दिनांक ११/०४/२०२५ ला आज्ञाकीत कक्षामध्ये हजर झालात. परंतु तुम्ही गैरहजेरीबाबत कोणतेही कारण सादर केले नाही. तसेच तुम्हाला दिनांक १७/१२/२०२४ रोजी तुमचे विरुध्द असलेल्या प्राथमिक चौकशीवर निर्णय घेणेकरीता आज्ञांकीत कक्षामध्ये बालविण्यात आले त्याबाबत दिनांक १७/१२/२०२४ रोजी सा.क्र. २४/२०२४ अन्वये नोंद घेण्यात आली असतांना सुध्दा तुम्ही हजर झाले नाही. यावरुन तुमचे विरुध्द ठेवण्यात आलेले दोषारोप तुम्हाला मान्य असल्याचे दिसुन येत आहे. तुम्ही वैदयकीय कारण पुढे करुन अनधिकृत कर्तव्यावरुन गैरहजर राहण्याचे सवईचे असुन तुम्हाला सुधारण्याची संधी देण्यात आली असतांना सुध्दा तुमचे वर्तणामध्ये कोणतेही बदल झाल्याचे निदर्शनास येत नाही. तसेच विभागीय चौकशीमध्ये तुमच्याविरुध्द ठेवण्यात आलेले दोषारोप हे पुर्णतः व निर्वीवादपणे सिध्द होत असल्याने प्रस्तावित शिक्षा कायम करुन खालील प्रमाणे अंतिम आदेश

## अंतिम आदेश

कसुरदार पोशि/१२४४ अक्षय रामदास उईके, तत्का. पो.मुख्या. यवतमाळ सध्या पो.स्टे. वणी यांना त्यांचेवरिल नमुद कसुरीबाबत मुंबई पोलीस (शिक्षा आणि अपिले) नियम १९५६ मधील नियम ३ (१) (तिन) व महाराष्ट्र पोलीस नियमावली १९९९ भाग-१ मधील नियम क्र. ४३६ (II) (क) मधील तरतुदीनुसार "सेवेतुन बडतर्फ" (Dismissal From service) ही शिक्षा देण्यात येत आहे.

सदर अंतिम आदेशानुसार देण्यात आलेली शिक्षा तुम्हास मान्य नसल्यास सदर शिक्षेबाबत तुम्ही विहीत मार्गाने विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र, अमरावती यांचेकडे ६० दिवसाचे आंत अपील करु शकतात.

( कुमार चिंता )
**पोलीस अधीक्षक, यवतमाळ**

प्रति,

**पोशि/१२४४ अक्षय रामदास उईके,**
नेमणुक पोलीस मुख्यालय यवतमाळ.

**मार्फत :- राखीव पोलीस निरीक्षक, पोलीस मुख्यालय यवतमाळ. (व्दीप्रतीत)**
२/- सदर अंतिम आदेशाची एक प्रत संबधीतास अदा करुन दुय्यम प्रतीवर त्यांची दिनांकीत स्वाक्षरी घेवुन सदरची दुय्यम प्रत त्वरीत या कार्यालयास उलट टपाली सादर करावी.

प्रत :- **उपविपोअ पुसद/प्र.अधि.पो.स्टे.अवधुतवाडी/पोलीस उप अधीक्षक (मुख्या) यवतमाळ/प्रभारी अधिकारी, पो.स्टे. वणी/रापोनि पो.मुख्या.यवतमाळ/कक्ष-९/कक्ष-०९-०३/राजपत्र लिपीक(कक्ष-१४)/वेतन लिपीक(कक्ष-१८)/पेन्शन लिपीक/ जि.पी.एफ. लिपीक,/कक्ष-२४** यांना माहिती व पुढील योग्य त्या कार्यवाहीस.

**प्रत :- कक्ष-०९-०३,** यांनी सदर शिक्षेची नोंद नमुद पोलीस अंमलदार यांचे सेवापटात नोंदवुन त्यावर कार्यालय अधीक्षक यांची प्रतिस्वाक्षरी घेवुन त्याची छांयाकीत प्रत या शाखेस सादर करावी.

क्रमांक:पोअय/कक्ष-9(3)/पोहवा-1073 बेले/मयत/4258/2025
कार्यालय पोलीस अधिक्षक, यवतमाळ
एल.आ.सी.चौक ता. व जि.यवतमाळ,.पिन कोड : 445001
Email- sp.yavatmal@mahapolice.gov.in
दिनांक : 15 APR 2025

## कार्यालयीन आदेश

पोहवा/1073 साहेबराव विठ्ठल बेले, नेमणुक-पो.स्टे.दिग्रस यांचे दिनांक.20/02/2025 रोजी अल्पशा आजाराने त्यांचे नागपूर येथे उपचारा दरम्यान निधन झाल्याने, त्यांचे नाव यवतमाळ जिल्हा पोलीस दलाचे आस्थापनेवरुन दिनांक.20/02/2025 रोजीचे म.नं कमी करण्यात येत आहे.

Signed by
Kumar Chintha
Date: 12-04-2025 12:41:28

पोलीस अधीक्षक,यवतमाळ

प्रति,

पोलीस निरीक्षक,पो.स्टे.दिग्रस.

प्रत:- प्रमुख लिपिक(लेखा शाखा)/प्रमुख लिपिक आस्थापना शाखा(कक्ष-9)/प्रमुख लिपिक पत्रव्यवहार शाखा/पेशंन लिपिक कक्ष-16/भ.नि.नि लिपिक कक्ष-15/वेतन लिपिक(कक्ष-18)/वि.चौ.लिपिक (कक्ष-12)/ कक्ष-11मंत्रालयीन लिपिक/कक्ष-14 डि.पी.जी लिपिक/कार्यालय अधीक्षक यांना माहीतीस्तव.

महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

क्र: पोअय/कक्ष-१२/क.श्रे.लि.-शिंदे/विनंती अमान्य/ 4298 /२०२५
कार्यालय पोलीस अधीक्षक,यवतमाळ.
एल.आय.सी.चौक, ता. व जि.यवतमाळ
पिन कोड ४४५ ००१.
Email: sp.yavatmal@mahapolice.gov.in
दिनांक :- 15 APR 2025

**महत्वाचे**

**संदर्भ :-** अर्जदार क.श्रे.लि. मनोज शिंदे, नेमणुक पो.अ. कार्या. यवतमाळ यांचे दिनांक २७/०२/२०२५ चे पुर्नविलोकन अर्ज.

**विषय :- शिक्षेचे पुर्नविलोकन करणेबाबत..**

---ooo---

उपरोक्त संदर्भाकीत विषयान्वये कळविण्यात येते की, कनिष्ठ श्रेणी लिपीक/ मनोज शिंदे, नेमणुक पो.अ. कार्या. यवतमाळ यांचेविरुध्द तक्रारदार श्रीमती शामल थिगळे, रा. पुसद, जि. यवतमाळ यांनी दिलेल्या तक्रार अर्ज प्रकरणी प्राथमिक चौकशीअंती या कार्यालयाचे दिनांक चे २१/०२/२०२५ चे अंतिम आदेशान्वये "पुढील देय वार्षीक वेतनवाढ एक (०१) वर्ष रोखणे (अपरिणामकारक)" ही शिक्षा देण्यात आली असुन सदर शिक्षेचे अनुषंगाने पुर्नविलोकन अर्ज या कार्यालयास प्राप्त झाला आहे.

त्याअन्वये कनिष्ठ श्रेणी लिपीक/ मनोज शिंदे, नेमणुक पो.अ. कार्या. यवतमाळ यांना प्राथमिक चौकशीअंती देण्यात आलेली "पुढील देय वार्षीक वेतनवाढ एक (०१) वर्ष रोखणे (अपरिणामकारक)" ही शिक्षा कसुरीचे अनुषंगाने योग्य असल्याने शिक्षेचे पुर्नविलोकन करणेबाबतची विनंती **अमान्य** करण्यात येत आहे.

**( कुमार चिंता )**
**पोलीस अधीक्षक यवतमाळ**

**प्रति,**

**क.श्रे.लि./मनोज शिंदे,**
**नेमणुक पो.अ. कार्या. यवतमाळ.**

**मार्फत :- कार्यालय अधीक्षक, पो.अ. कार्या. यवतमाळ.**
२/- सदर पत्राची मुळ प्रत संबधीतास अदा करुन दुय्यम प्रतीवर त्यांची दिनांकीत स्वाक्षरी घेवुन ती प्रत तात्काळ या कार्यालयास सादर करण्यात यावी. क

1 **प्रत :- कक्ष-१०/कक्ष-१४/नोंदणी लिपीक,** पो.अ.कार्या. यवतमाळ यांना आवश्यक त्या कार्यवाहीकरीता.

क्र: पोअय/कक्ष-१२/वि.चौ/अ.आ/पोशि-११४३ मुप्पीडवार/ 4296 /२०२५
कार्यालय पोलीस अधीक्षक, यवतमाळ.
एल. आय. सी. चौक, ता. व जि. यवतमाळ
पिन कोड :- ४४५ ००१.
Email- sp.yavatmal@mahapolice.gov.in
दिनांक :- 15 APR 2025

## अंतिम आदेश

**संदर्भ** :- पोअय/कक्ष-१२/वि.चौ/कादानो/पोशि-११४३ मुप्पीडवार/११८१/२०२५, दिनांक २३/०१/२०२५.

**कसुरदाराचे नाव** :- पोशि/११४३ संदिप मुप्पीडवार, तत्का. नेमणुक पो.मुख्या. यवतमाळ सध्या पो.स्टे. उमरखेड.

**थोडक्यात कसुरी** :- दिनांक ०८/०३/२०२२ ते २२/१०/२०२२ व दिनांक १२/१२/२०२२ ते ०९/०९/२०२४ पर्यत दिर्घकालावधी पासुन कर्तव्यावर गैरहजर राहुन खालील प्रमाणे कर्तव्यात कसुरी केल्याबाबत.

---ooo---

१) कसुरदार पोशि/११४३ संदिप विठठलराव मुप्पीडवार तुम्ही पोलीस मुख्यालय यवतमाळ येथे नेमणुकीस असुन पांढरकवडा येथे बोरी पोलीस चौकी व आर.टी.ओ. चेक पोस्टवरुन नागपुरवरुन अदिलाबाद जाणारे जनावरांचे (गोधन) तस्करांकडुन पैसे घेवुन ट्रक बॉर्डर पास करण्याचे काम करीत असुन गांजा, दारु, जनावरे व गुटख्याचे ट्रक पिपंळखुटी चेकपोस्टवरुन पैसे घेवुन सोडुन देतात. तसेच निजामाबाद व अदिलाबाद येथुन येणारा गांजा व गुटखा तुम्ही पैसे घेवुन महाराष्ट्र बॉर्डरपास करता. याबाबत तक्रारदार समाजिक कार्यकर्ता श्री. अनिल दादाराव कदम, रा. प्रभात नगर, भोसा रोड, यवतमाळ यांनी दिनांक ११/१०/२०२२ रोजी तक्रार अर्ज या कार्यालयास सादर केलेला आहे.

२) कसुरदार पोशि/११४३ संदिप विठठलराव मुप्पीडवार नेमणुक पोलीस मुख्यालय यवतमाळ तुमचे विरुध्द तक्रारदार श्री. अनिल दादाराव कदम, रा. प्रभात नगर, भोसा रोड, यवतमाळ यांनी दिलेल्या तक्रार अर्ज प्रकरणी चौकशी केली असता, तुम्ही दिनांक ०८/०३/२०२२ ते दिनांक २२/१०/२०२२ पावेतो एकुण २२८ दिवस आजारी रजेवर गेले असुन तुमचा एकुण २२८ दिवसाचा कालावधी हा या कार्यालयाचे आदेश क्र. पोअय/कक्ष-९(३)/सिक कालावधी/२०९५९/२०२४, दिनांक १४/१०/२०२४ चे आदेशान्वये असाधारण रजा म्हणुन मंजुर करण्यात आला आहे. तसेच तुम्ही दिनांक २३/१०/२०२२ रोजी कर्तव्यावर रुजु होवुन दिनांक ०६/११/२०२२ पासुन ते २५/११/२०२२ पावेतो मुंबई टपाल डयुटी बजावीत होते. तुम्ही सन २०१७ मध्ये वेळोवेळी २५ दिवस कर्तव्यावर गैरहजर होते. व तुम्ही दिनांक १२/१२/२०२२ ते ०९/०९/२०२४ पावेतो एकुण ६३८ दिवस सिक गैरहजर असल्याने या कार्यालयाचे आदेश क्र. पोअय/कक्ष-९(३)/सिक हजर/२०९६१/२०२४, दिनांक १४/१०/२०२४ चे आदेशान्वये विनावेतन करण्यात आले आहे. यावरुन तुमचे कोणतेही ठोस वैदयकीय कारण नसतांना सुध्दा तुम्ही कर्तव्यावर दिर्घकालावधी पासुन गैरहजर राहण्याचे सवईचे असल्याने तुमच्या कृत्यावरुन दिसुन येत आहे.

३) कसुरदार पोशि/११४३ संदिप विठठलराव मुप्पीडवार नेमणुक पोलीस मुख्यालय यवतमाळ तुम्ही पोलीस मुख्यालय यवतमाळ येथे नेमणुकीस असतांना दिनांक ०९/१०/२०१८ ते २४/१०/२०१८ पावेतो वनरक्षक बंदोबस्त पांढरकवडा, दिनांक १२/०२/२०१९ ते १५/०२/२०१९ पावेतो मुख्यमंत्री बंदोबस्त पांढरकवडा, दिनांक १८/०२/२०१९ ते २०/०२/२०१९ पावेतो शिवजयंती बंदोबस्त पांढरकवडा, दिनांक १९/०३/२०१९ ते २४/०३/२०१९ पावेतो होळी बंदोबस्त पाढरकवडा, दिनांक ०८/०४/२०१९ ते १२/०४/२०१९ पावेतो लोकसभा निवडणुक पांढरकवडा व दिनांक १३/०४/२०१९ ते १५/०४/२०१९ पावेतो रामनवमी बंदोबस्त पांढरकवडा तसेच दिनांक ०२/११/२०२१ ते १०/११/२०२१ पावेतो पाटण नाका पाटण असे पांढरकवडा येथे बंदोबस्त केल्याचे तुमच्या डयुटी रजिष्टरच्या नोंदीवरुन निदर्शनास येत आहे.

४) कसुरदार पोशि/११४३ संदिप विठठलराव मुप्पीडवार नेमणुक पोलीस मुख्यालय यवतमाळ तुमच्या विरुध्द देण्यात आलेल्या तक्रार अर्जाचे अनुषंगाने नमुद तक्रारदार समाजिक कार्यकर्ता श्री. अनिल दादाराव कदम, रा. प्रभात नगर, भोसा रोड, यवतमाळ यांना दिनांक

बयाणामध्ये तुम्ही दिनांक ०५/०२/२०२३ रोजी पो.स्टे. पांढरकवडा हददीतील पारवा चौफुली येथे ट्रक धारकांकडुन पैश्याची मागणी करतांना तसेच जनावरांचे तस्करीमध्ये जानावर ने-आण करतांना दिसल्याचे नमुद केले आहे. सदर कालावधीबाबत शहानिशा केली असता, तुम्ही आजारी रजेवर असल्याचे अभिलेखावर आढळुण आले आहे. यावरुन तुम्ही आजारी रजेवर असल्याचा बनाव करुन हेतुपुरस्सर अवैध धंदयाना चालना देत असल्याचे दिसुन येत आहे.

५) कसुरदार पोशि/११४३ संदिप विठठलराव मुप्पीडवार नेमणुक पोलीस मुख्यालय यवतमाळ तुमचेबाबत उपविभागीय पोलीस अधिकारी, यवतमाळ यांनी गोपनिय माहिती घेतली असता, तुम्ही दिनांक ०५/०२/२०२३ रोजी पारवा चौफुली येथे जनावरांचे ट्रक धारकांकडुन वसुली करतांना आढळुन आल्याचे त्यांनी ११/०९/२०२३ चे चौकशी अहवालामध्ये नमुद केले आहे. तसेच तुम्ही अवैध कार्यवाहीमध्ये लिप्त असल्याबाबत यवतमाळ जिल्हयाचा एक दक्ष नागरीक या नावाने तक्रार अर्ज या कार्यालयास सादर करण्यात आला. यावरुन तुम्ही सदर अवैध धंदयामध्ये सक्रीय असल्याचे निदर्शनास येत आहे.

६) कसुरदार पोशि/११४३ संदिप विठठलराव मुप्पीडवार नेमणुक पोलीस मुख्यालय यवतमाळ तुम्ही दिनांक १२/१२/२०२२ रोजी उजव्या पायाचे तळपायात गाठ तयार झाल्याने ऑपरेशन करीता सिक पास ची मागणी केल्याने तुम्हाला सिक पास देण्यात आली. तुम्ही आजाराबाबतचे बेडरेस्ट चे प्रमाणपत्र व वैदयकीय उपचाराचे कागदपत्रे तसेच कोणत्याही प्रकारची माहिती पोलीस मुख्यालय यवतमाळ येथे सादर न केल्याने तुमचे वेतन बंद करणेसंबधाने रा.पो.नि. पो.मुख्या. यवतमाळ यांनी शिफारस केल्याने आदेश क्र. पोअय/कक्ष-९/पो.अमंलदार/वेतन बंद/६४९१/२०२३, दिनांक ३०/०६/२०२३ अन्वये तुमचे वेतन बंद करण्यात आले. महाराष्ट्र पोलीस नियमावली १९९९ भाग ०१ नियम ३५५ (९) प्रमाणे रजेसाठी किंवा रजेच्या मुदतवाढीसाठी वरिष्ठांना अर्ज करणे बंधणकारक असतांना तुम्ही तुमचे वेतन बंद करेपर्यत कोणतेही वैदयकीय कागदपत्र या कार्यालयास सादर केले नाही. यावरुन तुम्ही महाराष्ट्र पोलीस नियमावली १९९९ भाग ०१ नियम ३५५ (९) भंग केल्याचे दिसुन येत आहे.

७) कसुरदार पोशि/११४३ संदिप विठठलराव मुप्पीडवार नेमणुक पोलीस मुख्यालय यवतमाळ तुमचे गैरहजर कालावधीमध्ये या कार्यालयाचे आदेश क्र. पोअय/प्रली/कक्ष-९/पो.अंम./सार्व.बदली-२०२३/६५५५/२०२३, दिनांक ३०/०६/२०२३ नुसार तुमची पोलीस मुख्यालय यवतमाळ येथुन पो.स्टे. उमरखेड अशी प्रशासकीय बदली झाल्याने तुम्हाला पोलीस मुख्यालय यवतमाळ येथुन दिनांक १९/०७/२०२३ चे साना क्र. १३/२०२३ अन्वये सोडण्यात आले. परंतु तुम्ही ०८/०९/२०२४ पर्यत पो.स्टे. उमरखेड येथे हजर झालेले नाही. यावरुन तुम्ही वरिष्ठांनी दिलेल्या आदेशाची अवहेलना करीत असुन वरिष्ठांनी दिलेल्या आदेशाला जुमानत नसल्याचे तुमचे वर्तणुकीवरुन दिसुन येत आहे.

८) कसुरदार पोशि/११४३ संदिप विठठलराव मुप्पीडवार नेमणुक पोलीस मुख्यालय यवतमाळ तुम्ही तुमचे कर्तव्यावर वांरवार वैदयकीय कारणास्तव व अनधिकृतपणे गैरहजर राहुन व पोलीस मुख्यालय यवतमाळ येथुन वेगवेगळे बदोबस्त लावुन पो.स्टे. पांढरकवडा हददीतील बोरी पोलीस चौकी व आर.टी.ओ. चेक पोस्टवरुन नागपुरवरुन अदिलाबाद जाणारे जनावरांचे (गोधन) तस्करांकडुन पैसे घेवुन ट्रक बॉर्डर पास करण्याचे काम तसेच गांजा, दारु, जनावरे व गुटख्याचे ट्रक पिपंळखुटी चेकपोस्टवरुन पैसे घेवुन सोडुन देण्याचे अवैध काम करत असुन तुम्हाला तुमचे वर्तनामध्ये सुधारणा करणेबाबत वांरवार संधी देण्यात येवुन सुध्दा तुमच्या वर्तनामध्ये कोणत्याही प्रकारची सुधारणा दिसुन येत नसुन दिवसादिवस तुमचे अनधिकृत गैरहजर प्रकरणामध्ये वाढ होत आहे. व तुम्हाला कर्तव्याप्रती कोणतेही गांभीर्य दिसुन येत नाही. अशाप्रकारे तुम्ही तुमच्या पदाला न शोभणारे बेशिस्त, बेजबाबदार, भ्रष्टाचारी आचरण, नैतिक अध:पतनाचे व पोलीस अंमलदार या पदास अशोभनीय गैरवर्तन केले आहे.

९) कसुरदार पोशि/११४३ संदिप विठठलराव मुप्पीडवार नेमणुक पोलीस मुख्यालय यवतमाळ तुम्ही तुमचे कर्तव्यामध्ये वांरवार कोणतीही ठोस कारण नसतांना जाणीवपुर्वक गैरहजर राहुन अवैध धंदयामध्ये लिप्त असल्याचे दिसुन येत असुन तुमच्या या कृत्यामुळे पोलीस दलावर नामुष्की ओढवुन पोलीस विभागाची प्रतिमा जनमानसात मलिन होण्यास तुम्ही वांरवार कारणीभुत ठरत आहेत. तसेच तुमच्या वर्तनाचा परिणाम इतर कर्मचा-यांवर होवुन खात्याची शिस्त मोडण्याची शक्यता नाकारता येत नाही.

उपरोक्त प्रकरणी या कार्यालयाचे आदेश क्र. १) पोअय/कक्ष-१२(१)/प्रा.चौ/पोशि-११४३ मुप्पीडवार/१३२११/२०२३, दिनांक ०६/०९/२०२३ अन्वये प्रभारी अधिकारी सायबर पोलीस स्टेशन यांना प्राथमिक चौकशी करणेबाबत आदेशीत करण्यात आले. तसेच आदेश क्र २) पोअय/कक्ष-१२(१)/प्रा.चौ/पोशि-११४३ मुप्पीडवार/१५३५२/२०२३, दिनांक २५/१०/२०२३ अन्वये प्रभारी अधिकारी उपविभागीय पोलीस अधिकारी दारव्हा यांना प्राथमिक चौकशी करणेबाबत आदेशीत करण्यात आले. सदर प्राथमिक चौकशीमध्ये तुमचेवर ठेवण्यात आलेले दोषारोप निष्पन्न होत असल्यामुळे या कार्यालयाचे आदेश क्र. पोअय/कक्ष-१२/वि.चौ/पोशि-११४३ संदिप मुप्पीडवार/५७५२/२०२४, दिनांक २१/०५/२०२४ अन्वये विभागीय चौकशी आदेशीत करण्यात आली असुन उपविभागीय पोलीस अधिकारी वणी यांना प्राधिकृत करण्यात आले आहे. सदर विभागीय चौकशीमध्ये तुम्हास संपुर्ण संधी उपलब्ध करुन देण्यात येवुन उपविभागीय पोलीस अधिकारी, वणी यांनी दिनांक ०२/११/२०२४ रोजी विभागीय चौकशी पुर्ण करुन समारोप अहवाल सादर केला. सदर अहवालामध्ये तुम्ही केलेले कृत्य हे पोलीस खात्यास अशोभनिय, बेशिस्त व बेजबाबदारपणाचे तसेच तुम्ही कर्तव्यात अत्यंत गंभिर स्वरुपाचे गैरवर्तन केल्याचे निदर्शनास येत असल्यामुळे तुम्हाला या कार्यालयाचे कारणे दाखवा नोटीस क्र. पोअय/कक्ष-१२/वि.चौ/कादानो/पोशि-११४३ मुप्पीडवार/११८१/२०२५, दिनांक २३/०१/२०२५ नुसार तुम्हास नमुद कसुरीबाबत मुंबई पोलीस (शिक्षा आणि अपिले) नियम १९५६ मधील नियम ३ (२) (पाच) मधील तरतुदीनुसार "पुढील देय वार्षीक वेतनवाढ तिन (०३) वर्ष रोखण्याची (परिणामकारक) शिक्षा का देण्यात येवु नये? म्हणुन कारणे दाखवा नोटीस देण्यात आली होती. तुम्हाला दिनांक ०१/०२/२०२५ रोजी कारणे दाखवा नोटीस प्राप्त झाली व तुम्ही दिनांक १२/०२/२०२५ ला स्पष्टीकरण या कार्यालयास सादर केले. तसेच सदर कारणे दाखवा नोटीसचे अनुषंगाने प्रस्तावित करण्यात आलेल्या शिक्षेसंबधाने निर्णय घेणेकरीता तुम्हाला दिनांक ११/०४/२०२४ ला आज्ञाकीत कक्षामध्ये बोलविण्यात आले असता तुम्ही दिनांक ११/०४/२०२५ ला आज्ञाकीत कक्षामध्ये हजर झालात. परंतु तुम्ही गैरहजेरीबाबत कोणतेही कारण सादर केले नाही. तसेच तुम्ही अवैध लिप्त असल्याचे मान्य केले. यावरुन तुमचे विरुध्द ठेवण्यात आलेले दोषारोप तुम्हाला मान्य असल्याचे दिसुन येत आहे. तुम्ही वैदयकीय कारण पुढे करुन अनधिकृत कर्तव्यावरुन गैरहजर राहण्याचे सवईचे असल्याचे निदर्शनास येत नाही. तसेच विभागीय चौकशीमध्ये तुमच्याविरुध्द ठेवण्यात आलेले दोषारोप हे सिध्द होत असल्याने प्रस्तावित शिक्षा कायम करुन खालील प्रमाणे अंतिम आदेश निर्गमीत करण्यात येत आहे.

**अंतिम आदेश**

**कसुरदार पोशि/११४३ संदिप मुप्पीडवार, तत्का. नेमणुक पो.मुख्या. यवतमाळ सध्या पो.स्टे. उमरखेड यांना त्यांचेवरिल नमुद कसुरीबाबत मुंबई पोलीस (शिक्षा आणि अपिले) नियम १९५६ मधील नियम ३ (२) (पाच) मधील तरतुदीनुसार "पुढील देय वार्षीक वेतनवाढ तिन (०३) वर्ष रोखणे (परिणामकारक)" शिक्षा देण्यात येत आहे. सदरची शिक्षा ही सर्व प्रकारच्या रजा धरुन व किरकोळ रजा वगळुन गणण्यात येईल.**

सदर अंतिम आदेशानुसार देण्यात आलेली शिक्षा तुम्हास मान्य नसल्यास सदर शिक्षेबाबत तुम्ही विहीत मार्गाने मा.विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र, अमरावती यांचेकडे ६० दिवसाचे आंत अपील करु शकतात.

Kumar

**( कुमार चिंता )**
**पोलीस अधीक्षक, यवतमाळ**

**प्रति,**

**पोशि/११४३ संदिप मुप्पीडवार,**
नेमणुक पोलीस स्टेशन उमरखेड.

**मार्फत :- प्रभारी अधिकारी पोलीस स्टेशन उमरखेड. (व्दीप्रतीत)**
२/- सदर अंतिम आदेशाची मुळ प्रत संबधीतास अदा करुन दुय्यम प्रतीवर त्यांची दिनांकीत स्वाक्षरी घेवुन सदरची दुय्यम प्रत त्वरीत या कार्यालयास उलट टपाली सादर करावी.

**प्रत :- उपविपोअ दारव्हा/उपविपोअ वणी/प्रभारी अधिकारी पो.स्टे. सायबर/पो.स्टे. उमरखेड/रा.पो.नि. पो.मुख्या. यवतमाळ/कक्ष-९/कक्ष-०९-०३/राजपत्र लिपीक (कक्ष-१४)/वेतन लिपीक(कक्ष-१८)/नोंदणी लिपीक,** यांना माहिती व पुढील योग्य त्या कार्यवाहीस.

**प्रत :- कक्ष-०९-०३** यांनी सदर शिक्षेची नोंद नमुद पोलीस कर्मचारी यांचे सेवापटात नोंदवुन त्यावर कार्यालय अधीक्षक यांची

क्र: पोअय/कक्ष-१२/कसुरी/अंतिम आदेश/पोउपनि-घाटोळ/ 4293 /२०२५
कार्यालय पोलीस अधीक्षक,यवतमाळ.
एल.आय.सी.चौक, ता. व जि.यवतमाळ
पिन कोड ४४५ ००१.
Email: sp.yavatmal@mahapolice.gov.in
दिनांक :- 15 APR 2025

# अंतिम आदेश

**कसुरदार :-** पोउपनि/व्हि.ए.घाटोळ, नेमणुक पो.स्टे. अवुधतवाडी.

**संदर्भ :-** कारणे दाखवा नोटीस क्र. पोअय/कक्ष-१२/कसुरी/पोउपनि-घाटोळ/कादानो/८०१८/२०२४, दिनांक ०७/०७/२०२४.

**थोडक्यात कसुरी :-** :- अप.क्र. २४/२०२४ कलम कलम ३०२, ३०७ भादवि अन्वये दाखल गुन्हयात गंभीर स्वरुपाच्या उणीवा ठेवुन खालील प्रमाणे कर्तव्यात कसुरी केल्याबाबत.

---ooo---

**कसुरी :-**

पोउपनि/व्हि.ए.घाटोळ तुम्ही पो.स्टे. अवधुतवाडी येथे नेमणुकीस असुन दिनांक १७/०४/२०२४ रोजी चे मध्यवर्ती सनियंत्रण समितीचे सभे मध्ये पो. स्टे. अवधुतवाडी अप क्र. २४/२०२४ कलम ३०२,३०७ भा.द.वी. या गुन्हयाचे दोषारोपपत्राची गुणवत्ता तपासणी अपर पोलीस अधीक्षक यवतमाळ यांनी केली असता सदर गुन्हयाचा तपास तुम्ही केला असुन सदर गुन्हयाचे तपासामध्ये तुम्ही खालील प्रमाणे गंभीर स्वरुपाच्या त्रुटया ठेवल्याचे आढळुण आले आहे.

१) घटनास्थळ हे शारदा चौक मधील असुन तिथे बाजूबाजूला सि.सि.टी.व्ही. फुटेज आहे काय? याबाबत सि.सि.टी.व्ही ची पडताळणी करुन पुरावा रेकॉर्डवर आणला नाही.

२) जखमी/ मृतकाचे दि.१७.०१.२०२४ रोजीचे बयाना मध्येच वैद्यकीय अधिकारी यांचे शेरा आवश्यक आहेत (गंभीर जखमी) असून बयानाच्या शेवटी वैघकीय अधिकारी यांचे समक्ष बयान झाले असून त्यावर वैद्यकीय अधिकारी यांचा शेरा घेण्यात आलेला नाही.

३) आरोपीने वापरलेला चाकू बाबत मयाताची बहिण हिचे कडून रितसर ओळख पंचनामा करणे आवश्यक असतांना केला नाही.

४) प्रत्यक्षदर्शी साक्षीदार दिनेश राठोड यांचे कलम १६४ सि.आर.पी.सी. अन्वये नोंदवून घेतले नाही.

५) घटनास्थळावरुन चाकूचे कव्हर जप्त करण्यात आले आहे, सदरचे कव्हर हे जप्त चाकूचे आहे काय याबाबत पडताळणी केली नाही.

६) सदर संचिकेतील घटना रात्रीचे ९.४५ वा. दरम्यान असून सदर वेळी लाईट सुरू होती काय याबाबत विद्युत निरीक्षक यांचे कडून माहिती प्राप्त केली नाही.

७) प्रत्यक्षदर्शी यांनी आरोपीस कशाचे उजेडात पाहीले याबाबत त्यांचे बयानात स्पष्टता आणली नाही.

८) सदर गुन्हयातील आरोपी प्रथमेश प्रमोद सावंत वय २७ वर्षे रा. यवतमाळ यांना दि.१९.०१.२०२४ रोजी अटक करण्यात आली असून त्यांना अटके पासून दिनांक १७.०४.२०२४ रोजी ९० दिवस पुर्ण झाल्याचे निदर्शणास आले. फौजदारी प्रकिया संहिता १९७३ कलम १६७ (२)(अ)(१)अन्वये सदर गुन्हयात ९० दिवस पुर्ण दिवसांच्या आत दोषारोपपत्र न्यायप्रविष्ठ करणे आवश्यक असतांना तसे करण्यात आलेले नाही.

पोउपनि/व्हि.ए.घाटोळ, नेमणुक पो.स्टे. अवधुतवाडी तुम्ही सदर गुन्हयाचा तपास केला असुन तपास अपुर्ण असून त्यामध्ये गंभीर त्रुटी आढळून आल्या, सदरच्या त्रुटीची वेळीच पुर्तता करणे शक्य नसल्याने व विहीत मुदतीत दोषरोपपत्र न्यायप्रविष्ठ करणे आवश्यक असल्याने आरोपीस सदर बाबीचा फायदा होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

पोउपनि/ व्हि.ए.घाटोळ, नेमणुक पो.स्टे. अवधुतवाडी तुम्ही गुन्हयाचे कागदपत्र विहीत मुदतीचे १५ दिवस अगोदर सादर न करता वरिष्ठांच्या आदेशाकडे जाणीवपुर्वक दुर्लक्ष केले आणि आरोपीस बचावची संधी उपलब्ध उपलब्ध करुन दिली आहे. तुमचेवर सोपविण्यात आलेले तपासाचे कर्तव्य तुम्ही योग्य रितीने पार पाडले नाही. तपासमध्ये जणीवपुर्वक अक्षम्य हलगर्जीपणा व बेजबाबदारपणा दाखविला आहे. तसेच तुम्ही गुन्हयाची विहीत मुदतीत निर्गती न करता गुन्हे विनाकारण प्रलंबीत ठेवून तुम्ही कायदयाची तरतूद, शासन निर्णय व वरिष्ठांच्या आदेशांकडे जाणीव पूर्वक दुर्लेक्ष केलेले आहे.

उपरोक्त प्रकरणी अपर पोलीस अधीक्षक यवतमाळ यांचे अहवाल क्र. वाफौ/अपोअ/गुन्हे तपास/कसुरी/४९०/२०२४, दिनांक २७/०४/२०२४ अन्वयें या कार्यालयास कसुरी अहवाल सादर केलेला असुन सदर अहवालानुसार शिस्तबध्द अशा पोलीस खात्यात तपासी अधिकारी म्हणुन तपास करतांना नेमुन दिलेल्या कायदयाचे व नियमांचे उल्लंघन करुन तुम्ही उपरोक्त नमुद तपासामध्ये बेजबाबदारपणा व निष्काळजीपणा केल्याचे दिसुन येते. तुमच्या या प्रवृत्तीचा विपरित परिणाम इतर तपास पोलीस अधिकारी व अंमलदार यांचेवर होवुन पोलीस खात्याच्या शिस्तीस बाधा येण्याची शक्यता नाकारता येत नसल्याने तुम्हाला या कार्यालयाचे कारणे दाखवा नोटीस क्र. पोअय/कक्ष-१२/कसुरी/पोउपनि-घाटोळ/कादानो/८०१८/२०२४, दिनांक ०७/०७/२०२४ अन्वये मुंबई पोलीस (शिक्षा आणि अपिले) नियम १९५६ मधील नियम ३ (२) (पाच) मधील तरतुदीनुसार "पुढील देय वार्षीक वेतनवाढ एक (०१) वर्ष रोखण्याची (अपरिणामकारक) शिक्षा का देण्यात येवु नये? या प्रस्तावित शिक्षेची कारणे दाखवा नोटीस देण्यात आली. सदर नोटीस तुम्ही दिनांक ३०/०७/२०२४ रोजी स्विकारली पांतु तुम्ही सदर कारणे दाखवा नोटीसचे अनुषंगाने स्पष्टीकरण या कार्यालयास सादर केले नाही. तुम्हाला स्पष्टीकरण सादर करणेबाबत या कार्यालयाचे दिनांक १८/०९/२०२४ व १५/०१/२०२५, अन्वये स्मरणपत्र देण्यात आले असतांना सुध्दा तुम्ही स्पष्टीकरण सादर केले नाही. तुमचे मौखीक स्पष्टीकरण सादर करणेकरीता तुम्हास दिनांक ११/०४/२०२५ रोजी आज्ञांकीत कक्षात बोलावण्यात आले असता आज्ञांकीत कक्षामध्ये तुम्ही सादर केलेला मौखीक खुलासा समाधानकारक व संयुक्तीक नसल्याने प्रस्तावित करण्यात आलेली शिक्षा कायम करुन खालील प्रमाणे अंतिम आदेश निर्गमीत करण्यात येत आहे.

**अंतिम आदेश**

**पोउपनि/ व्हि.ए.घाटोळ, नेमणुक पो.स्टे. अवधुतवाडी यांना त्यांचेवरिल नमुद कसुरीबाबत मुंबई पोलीस (शिक्षा आणि अपिले) नियम १९५६ मधील नियम ३ (२) (पाच) मधील तरतुदीनुसार "पुढील देय वार्षीक वेतनवाढ एक (०१) वर्ष (अपरिणामकारक) रोखणे" ही शिक्षा देण्यात येत आहे. सदरची शिक्षा ही सर्व प्रकारच्या रजा धरुन व किरकोळ रजा वगळुन गणण्यात येईल.**

सदर अंतिम आदेशानुसार देण्यात आलेली शिक्षा तुम्हास मान्य नसल्यास सदर शिक्षेबाबत तुम्ही विहीत मार्गाने मा. विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र, अमरावती यांचेकडे <u>६०</u> दिवसाचे आंत अपील करु शकतात.

Kumar

**( कुमार चिंता )**
**पोलीस अधीक्षक, यवतमाळ**

**प्रति,**

**पोउपनि/ व्हि.ए.घाटोळ,**
नेमणुक पो.स्टे. अवधुतवाडी

**मार्फत :- उपविभागीय पोलीस अधिकारी, यवतमाळ. (व्दीप्रतीत)**

२/- सदर अंतिम आदेशाची एक प्रत संबधीतास अदा करुन दुय्यम प्रतीवर त्यांची दिनांकीत स्वाक्षरी घेवुन सदरची दुय्यम **प्रत त्वरीत** या कार्यालयास उलट टपाली सादर करावी.

क्र.:पोअय/कक्ष 12(1)/ अं.आ./सपोउपनि 1494 गौतम / 4299 /2
कार्यालय पोलीस अधीक्षक,यवतमाळ.
एल.आय.सी.चौक, ता. व जि.यवतमाळ
पिन कोड 445 001.
Email: sp.yavatmal@mahapolice.gov.in
दिनांक :- 15 APR 2025

महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

## अंतिम आदेश

**संदर्भ** :- कारणे दाखवा नोटीस क्र.पोअय/कक्ष १२(१)/कादानो/सपोउपनि १४९४ गौतम/२२६/२०२५, दि.०३/०१/२०२५

**कसुरदाराचे नाव :- सपोउपनि/१४९४ शैलेश भारतसिंह गौतम नेम.पो.स्टे. लाडखेड**

---ooo---

तुम्ही सपोउपनि/१४९४ शैलेश भारतसिंह गौतम नेम.पो.स्टे. लाडखेड येथे नेमणुकीस असून ते दिनांक १७/०७/२०२३ पासुन ते दि.०१/१०/२०२४ पर्यत ४४२ दिवस कर्तव्यावर गैरहजर होते. असा एकुण रजा कालावधी ४४२ दिवस रजा कालावधी हा या कार्यालयाचे पत्र क्र. पोअय/कक्ष-९(३)/सिक हजर/२१५२८/२०२४, दि. २९/१०/२०२४अन्वये संयुक्तीक कारण नसतांना गैरहजर राहिल्यामुळे ४४२ दिवस बिनपगारी रजा मंजूर करण्यात आली आहे. संदर्भ क्र.२ अन्वये **सपोउपनि/१४९४ शैलेश भारतसिंह गौतम नेम.पो.स्टे. लाडखेड** यांचे गैरहजर बाबतचे प्रकरण प्राथमिक चौकशी करण्यासाठी या शाखेस हस्तांतरीत केले आहे.

त्याअनुषंगाने **सपोउपनि/१४९४ शैलेश भारतसिंह गौतम नेम.पो.स्टे. लाडखेड** तुम्ही दि.०१/१०/२०२४ रोजी कर्तव्यावर हजर होण्याकरिता आले असता तुम्हाला मा. पोलीस अधिक्षक यांचे आज्ञांकित कक्षामध्ये हजर करुन घेण्यात आले. तुम्ही संयुक्तीक कारण नसतांना ४४२ दिवस गैरहजर राहील असल्याचे तुमचे कसुरी अहवालावरुन दिसून येत आहे. तसेच तुमच्या सेवापटावरुन पडताळणी केली असता १८/०५/१९९० ते २२/०५/२०२१ त्यांचा गैरहजर कालावधी २२८ दिवस विनावेतन करण्यात आला आहेत. सपोउपनि/१४९४ शैलेश भारतसिंह गौतम तुम्हाला नेहमीच गैरहजर व सीक रजेवर जाण्याची सवय असून तुमचा गैरहजर कसुरी अहवाल प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन, लाडखेड यांनी या कार्यालयास सादर केला आहे.

ठाणेदार पोलीस स्टेशन, लाडखेड यांचे पत्र क्र. ९२८/२०२४, दि.३०/०९/२०२४ अन्वये सपोउपनि/१४९४ शैलेश भारतसिंह गौतम नेम.पो.स्टे. लाडखेड यांची या कार्यालयाचे आदेश क्र. पोअय/प्रली/कक्ष-९ पो.अंमलदार सर्व सा. बदल्या-२०२२-६५५५/२०२३, दि. ३०/०६/२०२४ अन्वये पोलीस स्टेशन, दारव्हा येथून पो.स्टे. लाडखेड येथे बदली झाल्याने पो.स्टे. दारव्हा येथून साना क्र.५०/२०२३, दि.१७/०७/२०२३ चे २१/५२ वा. पो.स्टे. लाडखेड करिता बदलीवर सोडण्यात आले होते. परंतु तुमच्या मुलाची प्रकृती खराब असल्याने तुम्ही आजपर्यत हजर होवू शकले नाही. असे प्राथमिक चौकशी अहवालात नमूद केले आहे.

सपोउपनि/१४९४ शैलेश भारतसिंह गौतम नेम.पो.स्टे. लालखेड यांचे दि.३०/०९/२०२४ चा अर्ज सादर केला असून सदर अर्जात दि. १७/०७/२०२३ चे २१/५२ वा. पो.स्टे. दारव्हा येथून पो.स्टे. लाडखेड येथे बदलीवर सोडण्यात आले होते. परंतु ते पो.स्टे. दारव्हा येथून रवाना होवून पो.स्टे. लाडखेड येथे डयुटीवर हजर होवू शकले नाही. कारण तुमचा लहान मुलगा डिप्रेशन मध्ये गेलेला होता. त्याचा औषधोपचार डॉ. दिपक केळकर, अकोला यांचेकडे सुरु असून त्यांचे प्रकृतीकडे लक्ष देण्याकरिता मलाच राहावे लागले. कारण त्याच्या आईचे तो काहीच ऐकत नाही. त्यामुळे त्यांचे मन कोठेच लागत नव्हते. त्यामुळे मागील काही दिवसापासून त्याच्या प्रकृतीत सुधारणा होत असल्याने तुम्ही डयुटीवर हजर होण्याकरिता अर्ज सादर आहे.

असे हजर होतांना तुम्ही अर्जात नमूद केले आहे. त्याअनुषंगाने या कार्यालयाचे पत्र क्र. पोअय/कक्ष-९(३)/अ.गै.ह २०४९४/२०२४, दि. ०१/१०/२०२४ अन्वये सपोउपनि/१४९४ शैलेश भारतसिंह गौतम नेमणुक लाडखेड दि. १७/०७/२०२३ ते दि. ०१/१०/२०२४ पर्यत एकुण ४४२ दिवस अनधिकृत गैरहजर होते. ते दि. ०१/१०/२०२४ रोजी पोलीस अधीक्षक यांचे आज्ञांकित कक्षात हजर होणे करीता आले असता त्यांना दि. ०१/१०/२०२४ रोजी हजर करुन घेण आले आहे.

| गैरहजर कालावधी | | | | |
|---|---|---|---|---|
| अ.क्र. | वैद्यकिय कालावधी | दिवस | मंजूर करण्यात आलेली रजा | नेमणूक |
| १. | दि. १८/०५/९० | ०१ दिवस | बिनपगारी रजा | - |
| २. | दि. १६/०६/९० ते दि. १४/०७/९० | २९ दिवस | विनावेतन | - |
| ३. | दि. १९/११/९० ते दि. २६/११/९० | ०८ दिवस | विनावेतन | - |
| ४. | दि.२७/०४/९१ ते दि. २९/०४/९१ | ०३ दिवस | विनावेतन | - |
| ५. | दि.१२/०७/९१ ते दि. १४/०७/९१ | ०२ दिवस | विनावेतन | - |
| ६. | दि.१४/११/९५ ते दि. ०५/१२/९५ | २२ दिवस | विनावेतन | - |
| ७. | दि.२२/०४/९६ ते दि. २९/०४/९६ | ०८ दिवस | विनावेतन | - |
| ८. | दि.०३/११/९९ ते दि. ०७/१२/९९ | ३५ दिवस | विनावेतन | - |
| ९. | दि.०८/५/२००६ ते दि. २०/५/२००६ | १३ दिवस | विनावेतन | - |
| १०. | दि.०८/०२/२००८ ते १८/०३/२००८ | ३५ दिवस | विनावेतन | - |
| ११. | दि. १७/०४/२००८ ते दि. १९/०६/२००८ | ५२ दिवस | विनावेतन | - |
| १२. | दि. ०३/०५/२१ ते दि. २२/०५/२१ | २० दिवस | विनावेतन | - |
| १३. | दि.१७/०७/२०२३ ते दि. ०१/१०/२०२४ | ४४२ दिवस | विनावेतन | पो.स्टे. लालखेड |
| **अद्यापर्यत एकुण ६७० दिवस विनावेतन** | | | | |

उपरोक्त प्रकरणी **सपोउपनि/१४९४ शैलेश भारतसिंह गौतम** यांचे गैरहजर राहण्याच्या वृत्तीमुळे या कार्याल आदेश क्र. पोअय/ कक्ष १२(१)/प्रा.चौ./सपोउपनि १४९४ गौतम/२१५६८, दि. २९/१०/२०२४, अन्वये प्राथमिक चौक प्रस्तावित करण्यात आली असुन प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन, लोहारा यांना चौकशी करण्याकरिता प्राधिकृत करण आले होते. सदर प्राथमिक चौकशीमध्ये तुम्हास संपुर्ण संधी उपलब्ध करुन देण्यात येवुन प्रभारी अधिकारी, लोहारा य दिनांक १६/१२/२०२४ रोजी प्राथमिक चौकशी पुर्ण करुन अहवाल सादर केला.

सदर अहवालानुसार प्राथमिक चौकशी अंती दि. १८/०५/१९९० ते २२/०५/२०२१ त्याचा गैरहजर कालावधी २ दिवस विनावेतन करण्यात आला आहे. ते वारंवार गैरहजर राहण्याच्या सवयीचे असल्या बाबत त्यांच्या रिपोर्ट वरुन दि येत आहे. यावरुन त्यांचा कामाप्रती बेजबाबदारपणा असल्याचे निदर्शनास येत आहे._त्यामूळे त्या बाबत त्यांचा कर अहवाल सादर करुन ते गैरहजर असल्याने दिनांक १७/०७/२०२३ पासून ते ०१/१०/२०२४ पावेतो ४४२ दिवस कालाव गैरहजर असल्याचे दिसून येत आहे. तुम्ही दिनांक २९/१०/२०२४ रोजी मा. पोलीस अधिक्षक साहेब यांचे आ क्र.पो.अ.य./कक्ष-९(३)/२१५२८/२०२४ दि.२९/१०/२०२४ अन्वये कर्तव्यावर हजर करुन घेण्यात आले. सदर पोल अंमलदार सपोउपनि/१४९४ शैलेश भगतसिंग गौतम यांची ४४२ दिवस रजा विनावेतन करण्यात आलेले आहेत.

तुमच्या या बेपर्वा, बेशिस्त, बेजबाबदार वर्तणुकीसाठी तुमचेवर ठेवण्यात आलेले दोषारोप प्राथमिक चौकशीव निष्पन्न होत असुन, तुम्ही शिस्तबध्द अशा पोलीस खात्यात जबाबदार पदावर कार्यरत असतांना तुम्ही तुमचे कर्तव्य अक्षम्य बेशिस्तपणा, बेजबाबदारपणा केला आहे. तुमच्या या प्रवृत्तीचा विपरित परिणाम इतर कर्मचा-यावर होवुन पोल खात्याच्या शिस्तीस बाधा येण्याची शक्यता नाकारता येत नाही

शिस्तबध्द अशा पोलीस खात्यात जबाबदार पदावर कार्यरत असतांना तुम्ही तुमचे कर्तव्यात गैरहजर राहुन गैरवर्तन केले आहे. करीता तुम्हाला या कार्यालयाचे क्र.पोअय/कक्ष १२(१)/कादानो/सपोउपनि १४९४ गौतम/२२६/२०२५, दि.०३/०१/२०२५ नुसार **"पुढील देय वार्षिक वेतनवाढ तीन (०३) वर्षाकरीता (अपरिणामकारक) का रोखण्यात येवु नये ?"** या प्रस्तावित शिक्षेबाबत कारणे दाखवा नोटीस देण्यात आली. तुम्ही कारणे दाखवा नोटीस दि. २५/०१/२०२५ रोजी स्विकारली असून तुम्ही दि. ३०/०१/२०२५ अन्वये स्पष्टीकरण सादर केले आहे. तसेच तुम्हाला अंतीम निर्णय घेण्यापुर्वी तुमचे कसुरी संबंधाने बाजु मांडण्यासाठी. तसेच तुम्हाला अंतीम निर्णय घेण्यापुर्वी तुमचे कसुरी संबंधाने बाजु मांडण्यासाठी या कार्यालयाचे पत्र क्र. पोअय/कक्ष १२(१)/आज्ञांकित कक्ष/पो.अधि.अंमलदार/४१९२/२०२५, दि.०९/०४/२०२५ रोजी पत्राव्दारे दि. ११/०४/२०२५ रोजी सकाळी ०९.३० वा कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले. तुम्ही ४४२ दिवस गैरहजर राहण्याचे कारण तुमचा मुलगा माणसिक तणावात असल्याचे सांगितले. तेव्हा तुम्हाला तुमचा मुलगा मानसिक तनावाखाली का आहे याबाबत विचारणा करण्यात आली. तेव्हा तुम्ही यापुढे गैरहजर राहणार नाही असे सांगतले. तुम्ही आमचे समक्ष आज्ञांकित कक्षामध्ये सादर केलेले मौखिक व लेखी स्पष्टीकरण असमाधानकारक दिसून आले आहे. तसेच प्राथमिक चौकशीमध्ये कसुरदार यांना गैरहजर राहण्याची सवय असल्याचे निष्पन्न झाले आहे. त्याअनुषंगाने खालील प्रमाणे अंतिम आदेश निर्गमित करण्यात येत आहे.

## अंतिम आदेश

कसुरदार **सपोउपनि/१४९४ शैलेश भारतसिंह गौतम नेम.पो.स्टे. लाडखेड** यांना त्यांचेवरील कसुरीबाबत मुंबई पोलीस (शिक्षा आणि अपिले) नियम १९५६ मधील नियम ३ (२)(५) मधील तरतुदीनुसार **"पुढील देय वार्षिक वेतनवाढ दोन (०२) वर्षाकरीता रोखणे (अपरिणामकारक) "** ही शिक्षा देण्यात येत आहे. सदरची शिक्षा ही सर्व प्रकारच्या रजा धरुन व किरकोळ रजा सोडुन गणण्यात येईल.

सदर अंतिम आदेशानुसार देण्यात आलेली शिक्षा तुम्हास मान्य नसल्यास सदर शिक्षेबाबत तुम्ही विहीत मार्गाने आदेश मिळाल्याच्या दिनांकापासुन ६० दिवसाचे आत मा. विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र, अमरावती यांचेकडे अपिल अर्ज आमच्या मार्फतीने दोन प्रतित सादर करु शकता.

**(कुमार चिंता)**
**पोलीस अधीक्षक,यवतमाळ**

**प्रति,**

**सपोउपनि/१४९४ शैलेश भारतसिंह गौतम नेम.पो.स्टे. लाडखेड**

मार्फत :- **प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन, लाडखेड (व्दिप्रतीत)**

२) सदर अंतिम आदेशाची एक प्रत संबधीतास अदा करुन दुय्यम प्रतीवर त्यांची दिनांकीत नावानिशी स्वाक्षरी घेवुन सदरची दुय्यम प्रत त्वरीत या कार्यालयास उलट टपाली सादर करावी.

**प्रत :-** प्रमुख लिपीक आस्थापना, कक्ष ९ (३)/कक्ष १४/कक्ष-१८/नोंदणी लिपीक, पो.अ.यवतमाळ यांना माहिती व पुढील योग्य त्या कार्यवाहीस.

३/- आस्थापना लिपीक (कक्ष ९(३) यांनी सदर शिक्षेची नोंद नमुद पोलीस अंमलदार यांचे सेवापटात नोंदवुन त्यावर कार्यालय अधीक्षक यांची प्रतिस्वाक्षरी घेवुन त्याची छांयाकीत प्रत या शाखेस सादर करावी.

क्र.:पोअय/कक्ष 12(1)/ अं.आ./मपोना 1836 वेलोदे / /25
कार्यालय पोलीस अधीक्षक,यवतमाळ. 4300
एल.आय.सी.चौक, ता. व जि.यवतमाळ
पिन कोड 445 001.
Email: sp.yavatmal@mahapolice.gov.in
दिनांक :- 15 APR 2025

## अंतिम आदेश

**संदर्भ** :- कारणे दाखवा नोटीस क्र. पोअय/विचौ/कक्ष १२ (१)/कादानो/मपोना १८३६ वेलोदे/५०२०/२०२४, दि.०३/०५/२०२५.

**कसुरदाराचे नाव :- मपोना/१८३६ संध्या वेलोदे नेम. पोलीस स्टेशन, वडगाव जंगल**

---ooo---

**मपोना/१८३६ संध्या वेलोदे, नेम. पोलीस स्टेशन, वडगाव जंगल** तुमची दि. २०/०९/२०२३ रोजी सकाळ गणने डयुटी पो.स्टे. अप.नं.२४२/ २०२३ कलम ३७६ भादंवी पोक्सो व अजाज कायदयामधील पिडीत नामे कु. अर्पिता विठ्ठ कुडमेथे वय १६ वर्ष रा. धानोरा हिची वैद्यकिय तपासणी करीता नेमली असता मे.MO सा.यांनी सदर पिडीतेला दवाखान्या भरती करुन घेतले व तिचे देखभाल करीता तुम्हाला नेमण्यात आले होते. सदर पिडीत ही दवाखान्यात भरती असतांना तुम्ह मपोना/१८३६ संध्या वेलोदे तुम्हाला दिलेली जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडणे आवश्यक असतांना तुम्ही सदर पिडीतेबाब सुट्टी झाली किंवा नाही याबाबत न कळविता तुम्ही परस्पर दि.२५/०९/२०२३ पासून अनधिकृतपणे गैरहजर राहील्या. तुम्ह पिडीत मुलगी त्यांच्या देखरेखीखाली असतांना तुम्ही परस्पर गैरहजर राहुन पोलीस खात्यात अशोभनीय कृत्य केले आहे.

मपोना/१८३६ संध्या वेलोदे, नेम. पोलीस स्टेशन, वडगाव जंगल तुम्हाला ठाणेदार पो.स्टे. वडगाव जंगल यां कर्तव्यावर हजर होणेविषयी फोनव्दारे संपर्क केला असता तुम्ही त्यांना "मी दोन दिवसाने हजर होते." असे म्हणाले व पुन्ह फोन केला असता मी इकडे आहे तिकडे आहे असे सांगून दोन दिवसाने हजर होते असे म्हणत तुम्ही दि.२७/१०/२०२३ रोज ११.१६ वा.एकुण ३३ दिवस गैरहजर राहिल्या. तसेच तुम्ही परत येतेवेळी दवाखान्यातील उपचाराचे कागदपत्र दाखल केल असून सदरची कागदपत्र ही समाधानकारक वाटत नाहीत. तसेच तुम्ही नेहमीच गैरहजर व सीक रजेवर जाण्याच्या सवई असल्याचे निदर्शनास येत आहे.

उपरोक्त प्रकरणी या कार्यालयाचे आदेश क्र. पोअय/कक्ष १२-१/प्रा.चौ./मपोना १८३६ वेलोदे/१९२३/२०२४ दि. १६/०२/२०२४ अन्वये प्राथमिक चौकशी प्रस्तावित करण्यात आली असुन सदर चौकशी ठाणेदार, उपविभागीय पोलीस अधिकारी, यवतमाळ यांना प्राधिकृत करण्यात आले आहे. सदर प्राथमिक चौकशीमध्ये तुम्हास संपुर्ण संधी उपलब्ध करु देण्यात येवुन उपविभागीय पोलीस अधिकारी, यवतमाळ यांनी दिनांक १४/०४/२०२४ रोजी प्राथमिक चौकशी पुर्ण करु अहवाल सादर केला आहे. सदर अहवालानुसार तुमचेवर ठेवण्यात आलेले दोषारोप निष्पन्न होत आहे. तुम्ही शिस्तबध्द अश पोलीस खात्यात जबाबदार पदावर कार्यरत पो.स्टे. अप.नं.२४२/ २०२३ कलम ३७६ भादंवी पोक्सो व अजाज कायदयामधील पिडीत नामे कु. अर्पिता विठ्ठल कुडमेथे हिला डिस्चार्ज झाल्यानंतर दि. २५/०९/२०२३ रोजी तुम्ही कर्तव्यावर हजर होण आवश्यक होते. परंतु त्यांनी तसे न करता ते दि. २६/०९/२०२३ ते दि.२६/१०/२०२३ पावेतो अनधिकृतपणे गैरहजर राहिल्याच दिसून येत आहे. तुमच्या या प्रवृत्तीचा विपरीत परीणाम इतर पोलीस अंमलदार यांचेवर होवुन पोलीस खात्याचे शिस्तीर बाधा येण्याची शक्यता नाकारता येत नाही.

शिस्तबध्द अशा पोलीस खात्यात जबाबदार पदावर कार्यरत असतांना तुम्ही तुमचे कर्तव्यात गैरहजर राहुन गैरवर्तन केले आहे. करीता तुम्हाला या कार्यालयाचे क्र. पोअय/विचौ/कक्ष १२ (१)/कादानो/मपोना १८३६ वेलोदे/५०२०/२०२४, दि.०३/०५/२०२५ नुसार **"पुढील देय वार्षिक वेतनवाढ तीन (०३) वर्षाकरीता (अपरिणामकारक)**

रोखण्यात येवु नये ?" या प्रस्तावित शिक्षेबाबत कारणे दाखवा नोटीस देण्यात आली. तुम्ही कारणे दाखवा नोटीस दि. २३/०५/२०२४ रोजी स्विकारली असून तुम्ही स्पष्टीकरण दि.०८/०२/२०२५ रोजी सादर केले आहे. तसेच तुम्हाला अंतीम निर्णय घेण्यापुर्वी तुमचे कसुरी संबंधाने बाजु मांडण्यासाठी या कार्यालयाचे पत्र क्र. पोअय/कक्ष १२(१)/आज्ञांकित कक्ष/पो.अधि.अंमलदार/४१९२/२०२५, दि.०९/०४/२०२५ रोजी पत्राव्दारे दि. ११/०४/२०२५ रोजी सकाळी ०९.३० वा कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले. तुम्हाला तुमचे म्हणणे मांडता यावे म्हणुन तुम्हाला आमचे समक्ष बोलावण्यात आले. तसेच समक्ष आज्ञांकित कक्षामध्ये तुम्ही सादर केलेले मौखिक निवेदन असमाधानकारक दिसून आले आहे. तसेच प्राथमिक चौकशीमध्ये पहिल्या भागात तुमची कोणतीही चूक नसल्याचे नमूद केले आहे. आणि दुस-या भागात तुम्ही जाणिवपुर्वक गैरहजर असल्याचे नमूद केले आहे. त्याअनुषंगाने खालील प्रमाणे अंतिम आदेश निर्गमित करण्यात येत आहे.

## अंतिम आदेश

कसुरदार **मपोना/१८३६ संध्या वेलोदे नेम. पोलीस स्टेशन, वडगाव जंगल** यांना त्यांचे वरील कसुरीबाबत मुंबई पोलीस (शिक्षा आणि अपिले) नियम १९५६ मधील नियम ३ (२)(४) मधील तरतुदीनुसार **" रु.५००/- आर्थिक दंड "** ही शिक्षा देण्यात येत आहे.

सदर अंतिम आदेशानुसार देण्यात आलेली शिक्षा तुम्हास मान्य नसल्यास सदर शिक्षेबाबत तुम्ही विहीत मार्गाने आदेश मिळाल्याच्या दिनांकापासुन ६० दिवसाचे आत पोलीस महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र, अमरावती यांचेकडे अपिल अर्ज आमच्या मार्फतीने दोन प्रतीत सादर करु शकता.

**(कुमार चिंता)**
**पोलीस अधीक्षक,यवतमाळ**

**प्रति,**

**मपोना/१८३६ संध्या वेलोदे नेम. पोलीस स्टेशन, वडगाव जंगल**

**मार्फत :- उपविभागीय पोलीस अधिकारी, यवतमाळ (व्दिप्रतीत)**

२/- सदर अंतिम आदेशाची एक प्रत संबधीतास अदा करुन दुय्यम प्रतीवर त्यांची दिनांकीत नावानिशी स्वाक्षरी घेवुन सदरची दुय्यम प्रत त्वरीत या कार्यालयास उलट टपाली सादर करावी.

**प्रत :-** प्रमुख लिपीक, आस्थापना/ कक्ष ९ (४)/कक्ष १४/कक्ष १८/ ठाणेदार, पोलीस स्टेशन, वडगाव जंगल यांना माहिती व पुढील योग्य त्या कार्यवाहीस.

३/- उपरोक्त आदेशामधील नमुद दंडाची वसुली वेतन लिपीक (कक्ष १८) यांनी नमुद पोलीस अंमलदार यांचे वेतनामधुन कपात करुन महिन्याचे शेडयुलच्या छायांकित प्रतिसह अनुपालन अहवाल या शाखेस सादर करावा.

४/- आस्थापना शाखा लिपीक कक्ष ९-(४) यांनी सदर शिक्षेची नोंद नमुद पोलीस अंमलदार यांचे सेवापटात नोंदवुन त्यावर कार्यालय अधीक्षक यांची प्रतिस्वाक्षरी घेवुन त्याची छांयाकीत प्रत या शाखेस सादर करावी.

क्र.:पोअय/कक्ष 12(1)/ अं.आ./बियंचा- चिचकार / 4301 /25
कार्यालय पोलीस अधीक्षक,यवतमाळ.
एल.आय.सी.चौक, ता. व जि.यवतमाळ
पिन कोड 445 001.
Email: sp.yavatmal@mahapolice.gov.in
दिनांक :- 15 APR 2025

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

## अंतिम आदेश

**संदर्भ** :- कारणे दाखवा नोटीस क्र.पोअय/कक्ष १२(१)/कादानो/बियंचा चिचकार/५४४४/२०२५, दि.१५/०५/२०२४

**कसुरदाराचे नाव** :- **बियंचा/विनोद रामदास चिचकार नेमणुक बिनतारी संदेश विभाग, यवतमाळ**

---ooo---

तुम्ही **बियंचा/विनोद रामदास चिचकार नेमणुक बिनतारी संदेश विभाग, यवतमाळ** तुम्हाला कर्तव्यावर स्वमर्जीने वागण्याची सवय आहे. दि.१४/०८/२०२३, दि. ०२/०९/२०२३, दि. ११/०९/२०२३, दि. १२/०९/२०२३ रोजी वरिष्ठांची कोणतीही पूर्व परवानगी न घेता कर्तव्यावरुन परस्पर निघून गेले तसेच दि.०२/०९/२०२३ रोजी वरिष्ठ कार्यालयाकडून येणारे महत्चपूर्ण संदेशाचे वितरण केले नाही. तुम्ही कर्तव्यावर असतांना तुमच्या ताब्यात स्थानकातील यंत्रणा व महत्वपूर्ण गोपनीय दस्ताऐवज जे महत्वपूर्ण येणारे जाणारे संदेशाचे CODING/DECODING करिता वापरतात. परंतु **बियंचा/विनोद रामदास चिचकार तुम्हाला** याबाबचे कोणतेही गांभिर्य जाणवत नाही. तुम्ही यापूर्वी सुध्दा दि.१३/०४/२३ ते दि.११/०५/२३ पर्यत कोणत्याही प्रकारची पूर्व परवानगी न घेता कर्तव्यावरुन निघून गेले व सिक पास इत्यादी न घेता परस्पर २९ दिवस कर्तव्यावर गैरहजर राहिले. तुम्ही कर्तव्यावर असतांना प्रिंटरमध्ये बिघाड करुन महत्वपूर्ण संदेश प्रलंबित ठेवले. तुम्हाला याबाबत जाब विचारला असता मी अनुसूचीत जमातीचा असून मला जास्त बोलायचे नाही. नाहीतर तुमचेवर (अॅट्रोसिटी) अनुसूचीत जाती जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदयाने गुन्हा दाखल करीन अशी धमकी देतात. तुमच्या या गैरवर्तनामुळे इतर पोलीस अंमलदारावर तसेच एकुण कामकाजावर विपरित परिणाम होत असून महत्वपूर्ण संदेश प्रलंबित राहतात.

बियंचा/विनोद चिचकार तुम्हाला पोलीस उपअधीक्षक (मुख्या.) यवतमाळ यांनी दि.२६/१२/२३ रोजी नोंदविलेल्या जबाबात यापुढे परस्पर गैरहजर राहणार नाही असे सांगितले असताना सुध्दा तुम्ही दि.०३/०१/२०२४ ते दि. १५/०१/२०२४ पावेतो. दि.०७/०३/२०२४ रोजी तुमची १३.०० ते २०.०० वा. डयुटी असतांना ते १७.०० वा. पावेतो कर्तव्यावर गैरहजर होते. दि. ०८/०३/२०२४ चे २०.०० वा ते दि.०९/०३/२०२४ चे ०८.०० वा. पावेतो डयुटी सुरु असतांना तुम्ही महत्वाचे प्रक्षेपण केले असतांना तेच मॅसेज पुन्हा प्रक्षेपित केले व सदर कालावधीत बाहेरील स्थानकाकडून प्राप्त झालेले एकुण १२५ संदेशाची वेळीच प्रिंट काढली नाही. त्यामुळे सदरचे संदेशन संबंधितांना विलंबाने वाटप करण्यात आले असून दि.११/०३/२०२४ रोजी १३.०० ते २०.०० वा. डयुटी असतांना ते १३.०० वा. पासून ते १५.०० वा. पावेतो कर्तव्यावरुन गैरहजर होते. दि.०१/०४/२०२४ चे २०.०० वा. ते दि. ०२/०४/२०२४ चे ०८.०० वा. पावेतो डयुटी असतांना त्यांचे डयुटी दरम्यान आलेले संदेश प्रमुख यंत्रचालक यांना वेळीच सादर करणे आवश्यक असतांना तुम्ही त्यांचे काळात आलेले संदेश १३.०० वा. सादर केले.

यावरुन बियंचा/विनोद चिचकार तुमच्याविषयी वरिष्ठांनी वेळोवेळी कसुरी अहवाल सादर करुन सुध्दा तुमचे वर्तवणुकीमध्ये कोणताही बदल झाल्याचे दिसून येत नसून ते वांरवार डयुटीवरुन गैरहजर राहणे, वरिष्ठांना कोणतीही पुर्व सूचना न देता डयुटीवर न येणे, महत्वाचे बाहेरुन आलेले संदेशाची वेळीच प्रिंट काढुण त्याची विल्हेवाट न लावणे त्याबाबत त्यांना विचारणा केली असता त्यांना धमक्या देणे, त्यांचे सोबत उध्दटपणाने बोलणे अशा प्रकारची तुमची वागणूक दिसून येत आहे.

उपरोक्त प्रकरणी या कार्यालयाचे आदेश क्र. पोअय/कक्ष १२(१)/प्राचौ/बियंचा-चिचकार/२३३८/२०२४, दि.०१/०३/२०२४ अन्वये प्राथमिक चौकशी प्रस्तावित करण्यात आली असुन उपविभागीय पोलीस अधिकारी, यवतमाळ यांना प्राधिकृत करण्यात आले आहे. सदर प्राथमिक चौकशीमध्ये तुम्हास संपुर्ण संधी उपलब्ध करुन देण्यात येवुन उपविभागीय

पोलीस अधिकारी, यवतमाळ यांनी दिनांक १५/०४/२०२४ रोजी प्राथमिक चौकशी पुर्ण करुन अहवाल सादर केला. सदर अहवालानुसार तुमचेवर ठेवण्यात आलेले दोषारोप निष्पन्न होत असुन तुम्ही केलेले कृत्य हे पोलीस खात्यास अशोभनिय, व गंभिर स्वरुपाचे असल्याचे निदर्शनास येत आहे. शिस्तबध्द अशा पोलीस खात्यात जबाबदार पदावर कार्यरत असतांना तुम्ही तुमचे कर्तव्यात अक्ष्यम्य बेशिस्तपणा, बेजबाबदारपणा व अप्रामाणिकपणा केला आहे. तुमच्या या प्रवृत्तीचा विपरित परिणाम इतर कर्मचा-यावर होवुन पोलीस खात्याच्या शिस्तीस बाधा येण्याची शक्यता नाकारता येत नाही.

शिस्तबध्द अशा पोलीस खात्यात जबाबदार पदावर कार्यरत असतांना तुम्ही तुमचे कर्तव्यात कसुरी केली आहे. करीता तुम्हाला या कार्यालयाचे क्र.पोअय/कक्ष १२(१)/कादानो/बियंचा चिचकार/५४४४/२०२५, दि.१५/०५/२०२४नुसार **"पुढील देय वार्षिक वेतनवाढ दोन (०२) वर्षाकरीता (अपरिणामकारक) का रोखण्यात येवु नये ?"** या प्रस्तावित शिक्षेबाबत कारणे दाखवा नोटीस देण्यात आली. तुम्ही कारणे दाखवा नोटीस दि.२४/०५/२०२४ रोजी स्विकारली असून तुम्ही स्पष्टीकरण सादर केले नाही. त्यानंतर तुम्हाला कारणे दाखवा नोटीसचे स्पष्टीकरण सादर करण्याबाबत २ स्मरणपत्राव्दारे कळविण्यात आले. तरीसुध्दा तुम्ही स्पष्टीकरण सादर केले नाही. तसेच तुम्हाला अंतीम निर्णय घेण्यापुर्वी तुमचे कसुरी संबंधाने बाजु मांडण्यासाठी या कार्यालयाचे पत्र क्र. पोअय/कक्ष १२(१)/आज्ञांकित कक्ष/पो.अधि.अंमलदार/४१९२/२०२५, दि.०९/०४/२०२५ रोजी पत्राव्दारे दि. ११/०४/२०२५ रोजी सकाळी ०९.३० वा कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले. तुम्हाला तुमचे म्हणणे मांडता यावे म्हणुन तुम्हाला भ्रमणध्वणीव्दारे संपर्क करण्यात आला तरीही तुम्ही आमचे समक्ष हजर झाले नाही. तुम्ही कारणे दाखवा नोटीसचे निवेदन सादर केले नसून तसेच प्राथमिक चौकशीमध्ये तुम्ही कसुरी केल्याचे निष्पन्न झाले आहे. त्याअनुषंगाने खालील प्रमाणे अंतिम आदेश निर्गमित करण्यात येत आहे.

## अंतिम आदेश

कसुरदार **बियंचा/विनोद रामदास चिचकार नेमणुक बिनतारी संदेश विभाग, यवतमाळ** यांना त्यांचेवरील कसुरीबाबत मुंबई पोलीस (शिक्षा आणि अपिले) नियम १९५६ मधील नियम ३ (२)(५) मधील तरतुदीनुसार **"पुढील देय वार्षिक वेतनवाढ दोन (०२) वर्षाकरीता रोखणे (अपरिणामकारक) "** ही शिक्षा देण्यात येत आहे. सदरची शिक्षा ही सर्व प्रकारच्या रजा धरुन व किरकोळ रजा सोडुन गणण्यात येईल.

सदर अंतिम आदेशानुसार देण्यात आलेली शिक्षा तुम्हास मान्य नसल्यास सदर शिक्षेबाबत तुम्ही विहीत मार्गाने आदेश मिळाल्याच्या दिनांकापासुन ६० दिवसाचे आत विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र, अमरावती यांचेकडे अपिल अर्ज आमच्या मार्फतीने दोन प्रतित सादर करु शकता.

**(कुमार चिंता)**
**पोलीस अधीक्षक,यवतमाळ**

**प्रति,**

**बियंचा/विनोद रामदास चिचकार नेमणुक बिनतारी संदेश विभाग, यवतमाळ**

**मार्फत :- पोलीस उप अधीक्षक, ( मुख्या.), यवतमाळ (व्दिप्रतीत)**

२) सदर अंतिम आदेशाची एक प्रत संबधीतास अदा करुन दुय्यम प्रतीवर त्यांची दिनांकीत नावानिशी स्वाक्षरी घेवुन सदरची दुय्यम प्रत त्वरीत या कार्यालयास उलट टपाली सादर करावी.

**प्रत :-** प्रमुख लिपीक आस्थापना, कक्ष ९ (५)/कक्ष १४/कक्ष-१८/नोंदणी लिपीक, पो.अ.यवतमाळ/प्रभारी अधिकारी, बिनतारी संदेश विभाग, यवतमाळ यांना माहिती व पुढील योग्य त्या कार्यवाहीस.

३/- आस्थापना लिपीक कक्ष ९(५) यांनी सदर शिक्षेची नोंद नमुद पोलीस अंमलदार यांचे सेवापटात नोंदवुन त्यावर कार्यालय अधीक्षक यांची प्रतिस्वाक्षरी घेवुन त्याची छांयाकीत प्रत या शाखेस सादर करावी.

# भाग - ०६

# प्रशिक्षण व इतर

निरंक